पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला
● वर्ष १६ ● अंक ५१ ● गुरूवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**
स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी विचारांसोबतच कठोर परिश्रमाची जोड असणे गरजेचे आहे.




# आर आर सी समुहाने आता महाराष्ट्रात भरारी घ्यावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## आर. आर. सी. समूहाचा रौप्य महोत्सव व कावड यात्रेचा भव्य योग
## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निमंत्रण, अकोला भेटीची ग्वाही

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**मुंबई** : आर आर सी समुहाने आता विदर्भातून संपुर्ण महाराष्ट्रात भरारी घ्यावी अशा शुभेच्छा व सदिच्छा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या. विदर्भात टॉपर असलेल्या आर आर सी समुहाच्या कार्याचा आढावा उपमुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आला. वर्धापन दिन सोहळ्या बरोबर भविष्यातील यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा उपमुख्यमंत्र्यांनी आर आर सी समुहाला दिल्यात.

अकोला शहराचे ग्रामदैवत श्री राजराजेश्वर पालखी सोहळा व कावड यात्रेच्या पावन पर्वावर 'आर. आर. सी.समूहा'च्या २५ वर्षांच्या दिमाखदार वाटचालीचा



रौप्य महोत्सवी वर्धापन दिन सोहळा पुढील महिन्यात अत्यंत उत्साहात पार पडणार आहे. या ऐतिहासिक प्रसंगाचे आग्रहाचे निमंत्रण राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आर आर सी समुहाचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख व चिन्मय देशमुख यांच्या हस्ते सन्मानपुर्वक देण्यात आले. उपमुख्यमंत्र्यांनी हे निमंत्रण अत्यंत आदराने स्वीकारत, लवकरच अकोला शहराला सदिच्छा भेट देण्याचे आश्वासन दिले आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेने वेधले लक्ष
भेटप्रसंगी उपमुख्यमंत्र्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची अत्यंत सुरेख 'वुडन हँड क्रॉफ्टेड' (लाकडी हस्तकला) प्रतिमा भेट देण्यात आली. ही कलाकृती पाहून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भारावून गेले. 'शिवरायांची ही प्रतिमा अत्यंत उत्कृष्ट आणि अप्रतिम आहे,' अशा शब्दांत त्यांनी कौतुक केले. यासोबतच, सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेची खास रचना पाहून त्यांनी तिचीही मनापासून स्तुती केली. उपमुख्यमंत्र्यांनी हे निमंत्रण अत्यंत आदराने स्वीकारत, लवकरच अकोला शहराला सदिच्छा भेट देण्याचे आश्वासन दिले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून अकोला शहराची सांस्कृतिक व धार्मिक ओळख असलेला श्री राजराजेश्वर पालखी सोहळा व कावड यात्रा येत्या ७ सप्टेंबर रोजी संपन्न होत आहे. याच शुभमुहूर्तावर आर. आर. सी. समूहाच्या रौप्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या दुग्धशर्करा योगाचे औचित्य साधून आर. आर. सी. समूहाचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख आणि चिन्मय देशमुख यांनी उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना सन्मानाचे निमंत्रण पत्र सुपूर्द केले. या प्रसंगी ॲड. निलेश देशमुख, राजेश निखाडे, अजिंक्य देशमुख तसेच 'आर आर सी न्यूज'चे मुंबई प्रतिनिधी राजेश जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी मुख्यमंत्र्यांनी घ्यावी!
## आदिवासी विद्यार्थ्यांची मागणी

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**नागपूर** : आमचं शैक्षणिक नुकसान होत आहे, विविध स्पर्धा परीक्षांची तयारी थांबली आहे, आंदोलन लांबल्यामुळे घरातून विचारणा होऊ लागली आहे, अशी प्रतिक्रिया देत नागपुरातील अप्पर आदिवासी आयुक्त कार्यालयात ठिय्या आंदोलनावर बसलेल्या विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांनी आमच्या आंदोलनाकडे लक्ष घालावे, अन्यथा आमच्या शैक्षणिक नुकसानाची जबाबदारी त्यांनी घ्यावी, अशी मागणी केली आहे. नागपुरात आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन १३ ऑगस्टपासून सुरू होते. २२ ऑगस्ट रोजी आदिवासी विकास मंत्र्यांशी चर्चा झाल्यानंतर तेव्हा आंदोलनाचं नेतृत्व करणाऱ्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील कमाल वयोमर्यादा शिथिल करण्याचे आश्वासन शासनाकडून मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेतले होते. मात्र दोनच दिवसात विद्यार्थ्यांमध्ये मतभेद होऊन बहुतांशी विद्यार्थ्यांनी पुन्हा आंदोलन सुरू केले. गेले तीन दिवस नव्याने सुरू झालेले आंदोलन आदिवासी विभागाचे अप्पर आयुक्त कार्यालयात सुरू आहे. कालही पुण्यात आदिवासी विकास मंत्री यांची चर्चा निष्फळ ठरली आहे. दरम्यान, सरकारने आतापर्यंत आमची फक्त वसतिगृहासाठीची वयोमर्यादा शिथिल करत त्या संदर्भातला जीआर रद्द करण्याची मागणी मान्य केली आहे. मात्र, वसतीगृहामध्ये सुधारणा करणे, आश्रम शाळा विद्यार्थ्यांसाठी जास्त सुरक्षित बनवणे, जपतलाई येथील सर्पदंशामध्ये मृत्युमुखी पडलेल्या मुलींच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची मदत करणे, आदिवासी विकास विभागात पद भरती करणे, डीबीटी पद्धत रद्द करून पूर्वीसारखीच पद्धत सुरू करणे, अशा विविध २९ मागण्या अजूनही पूर्ण झालेल्या नाही, त्यामुळे आमचं आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका या विद्यार्थ्यांनी जाहीर केली आहे.

**CLASSIFIED**

**प्रवेश देणे सुरू आहे**
आय.टी.आय. व १२ वी समकक्ष कोर्सेस
१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष
(२) बांधकाम पर्यवेक्षक १ वर्ष प्रवेश
पात्रता : - १० वी, १२ वी पास /नापास, टक्कवारीची अट नाही डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश.
संपर्क
स्नेहदीप व्होकेशनल
ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वर, राठीनगर, अमरावती
8087958087

**शेती विकणे आहे**
मौजा चांदूर, ता.जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.
शरदचंद्र नेवास्कर
9822702276

## »थोडक्यात

### पत्रकार कुंदन जाधव यांची आकस्मिक एक्झिट



**अकोला** : शहरातील तरूण तडफदार पत्रकार कुंदन जाधव यांचे आकस्मिक निधन सर्वांना चटका लावून गेले. ऐन उमेदीत त्यांनी एक्झिट घेतली. वृद्ध पिता, पत्रकार पत्नी प्रियंका आणि दोन लहान मुलींचा आधार अचानक निघून गेला. टीव्ही चॅनेलचे साठी रिपोर्टर म्हणून कुंदन जाधव कार्यरत होते. काल सायंकाळ पर्यंत सर्वांच्या संपर्कात राहिलेल्या कुंदन जाधव यांच्या निधनाचे वृत्त गुरूवारी सकाळी धडकले. सुरूवातीला विश्वास बसेना परंतु दुर्दैवाने ही बातमी सत्य ठरली. गुरूवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. शहरातील पत्रकार तसेच विविध स्तरातील नागरिक उपस्थित होते.

### चिमुरड्याला झोका खेळताना गळफास लागला!

**जळगाव** : घरात आनंदाने खेळत असताना झोपाळ्याच्या दोरीचा गळ्याभोवती फास लागून एका अवघ्या दीड वर्षाच्या चिमुकल्याचा अत्यंत दुर्दैवी आणि हृदयद्रावक अंत झाल्याची घटना समोर आली आहे. जळगाव जिल्ह्यातील नशिराबाद येथील राजर्षी छत्रपती शिवाजीनगर नवीन प्लॉट भागात ही दुर्घटना घडली.

# नेपाळमध्ये महापुराचे थैमान!

वृत्तसंस्था २७ऑगस्ट

**काठमांडू** : नेपाळ-तिबेट सीमेवर आलेल्या अचानक आलेल्या विनाशकारी पुरामुळे १६८ लोकांचा मृत्यू झाला. यापैकी १६५ नेपाळमध्ये आणि ३ तिबेटमध्ये होते. १,१०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळमध्ये बेपत्ता झालेल्यांमध्ये ४६६ परदेशी आणि ११३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. यामध्ये १०५ भारतीय आणि ३७ अनिवासी भारतीयांचा समावेश आहे.

बुधवारी सकाळी ८ वाजून ३७ मिनिटांनी नेपाळ-चीन सीमेजवळ, काठमांडूच्या उत्तरेला जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. सुरुवातीला, यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने हा ४.४ तीव्रतेचा भूकंप असल्याचे सांगितले. या दरम्यान, बर्फ आणि खडकांसह पर्वताचा एक मोठा भाग कोसळून ल्हेंडे खोला नदीत पडला. ही नदी भोटेकोशी नदीची उपनदी आहे, जी चीनमध्ये उगम पावते आणि खोल दऱ्यांमधून नेपाळमध्ये प्रवेश करते. शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की, हिमनदीचा एक मोठा भाग पर्वतापासून तुटून खाली पडला असावा. तथापि, या घटनेचे नेमके कारण निश्चित करण्यासाठी अनेक आठवडे लागू शकतात. नंतर, यूएसजीएसने स्पष्ट केले की तो भूकंप नव्हता. भूस्खलन इतके शक्तिशाली होते की त्यामुळे ५.२ तीव्रतेच्या भूकंपासारखा कंप निर्माण झाला. याचा अर्थ असा की, भूकंप झाला नव्हता, तर भूस्खलनामुळे भूकंपासारखा कंप निर्माण झाला होता.






**165** मृतकांची संख्या | **133** भारतीय बेपत्ता | **1,100** लोक अजूनही बेपत्ता

### भारतात याचा परिणाम कुठे आणि किती होईल?
1 भारतात, याचा परिणाम प्रामुख्याने बिहारमधील गंडक नदी आणि तिच्याशी संबंधित लहान-मोठ्या नद्यांवर अपेक्षित आहे. नेपाळमधून सुमारे ३ मीटर उंचीच्या पुराच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

2 पश्चिम चंपारण, पूर्व चंपारण, गोपालगंज, सारण, मुझफ्फरपूर आणि वैशाली येथे विशेष दक्षता ठेवण्यात येत आहे. सीतामढी आणि शिवहारवरही लक्ष ठेवून आहेत.

3 नेपाळमधील पाणी त्रिशुली नदीमार्गे गंडक नदीत पोहोचेल. यामुळे खालच्या बिहारमधील पाण्याची पातळी वाढू शकते. उत्तर प्रदेशातील महाराजगंज आणि कुशीनगर येथेही सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### २१ भारतीयांना वाचविले!
चीनच्या अधिकृत वेबसाइट सीसीटीव्ही नुसार, तिबेटमध्ये ५५० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. खराब हवामान आणि तुटलेल्या रस्त्यांमुळे ढिगाऱ्याखाली अडकलेल्या लोकांचा शोध मदत आणि बचाव पथके घेत आहेत. नेपाळी सैन्याने आज सकाळी रसुवा येथील तिमुरेमधून ११६ लोकांना वाचवले. यामध्ये ९५ नेपाळी आणि २१ भारतीयांचा समावेश आहे.

### केदारनाथ दुर्घटनेची पुनरावृत्ती!
हिमनदीच्या पाण्याने भरलेल्या चोराबाडी सरोवरामुळे २०१३ च्या केदारनाथ दुर्घटनेतही विध्वंस झाला होता. चोराबाडी ताल येथील नैसर्गिक हिमनदी-निर्मित धरण फुटले, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी, खडक आणि ढिगारा वाहून गेला. यामुळे केदारनाथ, गौरीकुंड आणि सोनप्रयाग यांसारख्या आसपासच्या भागांमध्ये प्रचंड विध्वंस झाला. सरकारी अंदाजानुसार, २०१३ च्या उत्तराखंड आपत्तीमध्ये ५८० लोकांचा मृत्यू झाला, ४,४७३ लोक जखमी झाले होते.



### महाराष्ट्रातील ८० पैकी ४ जणांशीच संपर्क : महाजन
आम्ही नेपाळ सरकारशीही संपर्क साधून आहोत. पंतप्रधानही त्यात लक्ष घालून आहोत. नेपाळच्या मानसरोवरसाठी भारतातूनही अनेक पर्यटक गेले होते. महाराष्ट्रातून ८० पर्यटक गेले होते. त्यातील अनेक पर्यटक वेगवेगळ्या राज्यातील आहेत. मात्र, या पर्यटकांपैकी फक्त चारच पर्यटकांशी संपर्क झाला. केंद्र आणि राज्य अलर्ट मोडवर आहे, असे राज्याचे मत्री गिरीश महाजन म्हणाले.

### भारताकडून मदत साहित्याची दुसरी खेप
नेपाळमध्ये पुरामुळे झालेल्या विध्वंसाच्या पार्श्वभूमीवर, भारताने नेपाळला मदत साहित्याची दुसरी खेप पाठवली आहे. भारतीय हवाई दलाच्या विमानाने पाठवलेल्या या खेपेत ३७.५ टन मदत साहित्य, अत्यावश्यक औषधे आणि अन्नधान्याच्या पाकिटांचा समावेश आहे. यापूर्वी बुधवारी रात्री, भारताने सी-१३० जे विमानाद्वारे १० टन मदत साहित्य आणि अत्यावश्यक औषधांची पहिली खेप काठमांडूला पाठवली होती.




# सर्वच मोठ्या मराठा नेत्यांकडे ओबीसी प्रमाणपत्र!
## विजय वडेट्टीवारांचा आरोप

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**चंद्रपूर** : मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते विखे पाटील यांच्याकडे ओबीसीचे प्रमाणपत्र असल्याचा आरोप होत आहे, असा प्रश्न काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांना विचारण्यात आला. यावर फक्त विखे पाटीलच नाही तर अनेक मराठा नेत्यांकडे ओबीसीचे प्रमाणपत्र आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी सुद्धा ओबीसीचे प्रमाणपत्र काढून ठेवले आहे, असा खळबळजनक दावा विजय वडेट्टीवार यांनी केला. सर्वच मोठ्या मराठा नेत्यांकडे ओबीसी प्रमाणपत्र आहे. शरद पवारांकडे देखील ओबीसी प्रमाणपत्र आहे का, हे मला माहित नाही, असे विधान विजय वडेट्टीवार यांनी आज माध्यमांशी संवाद साधताना केलं. विजय वडेट्टीवारांच्या दाव्यावर सुप्रिया सुळे यांना विचारले असता, हे सर्व ऐकून मला धक्का बसला. माझ्याकडे माझं जन्म प्रमाणपत्र आहे. डिग्रीचं प्रमाणपत्र आहे. त्यानंतर माझ्या लग्नाचं प्रमाणपत्र आणि बारमतीच्या खासदार म्हणून माझ्याकडे प्रमाणपत्र आहे. त्यामुळे रोज उठून काँग्रेस अशा प्रकारचे आरोप का करतंय?, याबाबत मला आश्चर्य वाटतंय, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळेंनी दिली. तसेच माझ्याकडे कोणतंच ओबीसीचं प्रमाणपत्र नाही, हे मी नक्की सांगते. काँग्रेस पक्षाकडून मला दररोज टार्गेट का केलं जातंय, याबाबत मी महाराष्ट्र काँग्रेसलाच विचारावं लागेल, हे दुर्दैवी आहे, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# इथेनॉलमधून पैसा मिळत असल्याने साखर सम्राट शांत!

**सोलापूर** : इथेनॉल धोरणाविरोधात दोन्ही राष्ट्रवादी, दोन्ही शिवसेना, भाजप आणि काँग्रेस हे सर्वच गप्प आहेत. कारण या सर्व पक्षांचे नेते 'साखर सम्राट' आहेत. या साखर सम्राटांना भाजपासोबत मिळून इथेनॉलच्या माध्यमातून मोठा पैसा मिळत आहे. त्यामुळे ते यावर काहीही बोलत नाहीत, असा हल्लाबोल वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी केला. ते सोलापूर येथे माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते. तु पुढे म्हणाले, २०१४ पासून देशात महागाई प्रचंड वाढली आहे. ज्यांनी पूर्वी गॅस सिलेंडर हातात घेऊन आंदोलने केली, त्यांच्याच काळात आज सर्वसामान्यांना गॅस, साखर आणि अन्नधान्याचे भाव परवडेनासे झाले आहेत. २०१४ नंतर कृषी उत्पादन घटल्याने आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने जनतेला महागाईचा सामना करावा लागत आहे. सुजात आंबेडकर म्हणाले की, राजकारणात पत्रकारांशी संवाद साधणे आणि जनतेच्या प्रश्नांची उत्तरे देणे आता दिसेनासे झाले आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी नेते, कार्यकर्ते, मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांनी नियमित पत्रकार परिषदा घेतल्या पाहिजेत. आम्ही पत्रकारांच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न करू. भाजप ज्या मुद्यांवर सत्तेत आला, त्या एकाही मुद्यावर काम झालेले नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण पूर्णपणे चुकले असून येणाऱ्या निवडणुकीत भाजपला याचा मोठा फटका बसेल, असेही ते म्हणाले.



# हिंदु धार्मिक प्रतीक 'स्वस्तिक'साठी विदेशात चालू असलेला संघर्ष....

## उत्तरार्ध....

गेल्या आठवड्यात न्यू जर्सीतील १५ वर्षांची मीरा त्रिवेदी हिने युक्तीवाद आणि पाठपुरावा केल्याने शाळा मंडळांनी त्यांच्या नियमावलीत पालट केला. 'स्वस्तिक हे द्वेषाचे प्रतीक नाही', हे मान्य करत त्यावरील बंदी हटवली. मीराने शालेय गणवेश नियमावलीही अद्ययावत् करून घेतली. देशातील स्वस्तिक पूजकांना याची कितपत माहिती झाली आहे आणि ज्यांना झाली, त्यांना ती किती महत्त्वाची वाटली, याची कल्पना नाही. तरी एक स्वस्तिकपूजक आणि साधक म्हणून स्वस्तिकासाठी विदेशात चालू असलेल्या संघर्षाची कहाणी मला महत्त्वाची वाटते. म्हणून हा लेखनप्रपंच...

२४ ऑगस्ट या दिवशी प्रसिद्ध झालेल्या लेखात आपण 'हाकेनक्रूझ' आणि 'स्वस्तिक' यांतील भेद, हाकेनक्रूझचा इतिहास, पाश्चिमात्य देशांत 'स्वस्तिक' द्वेषाचे प्रतीक कसे बनले ?, १० वर्षांपूर्वीपर्यंत 'स्वस्तिक' वापराविषयी भीती आणि अद्वितीय धार्मिक संघर्ष', यांविषयी वाचले. आज या लेखाचा अंतिम भाग येथे देत आहोत.

हिंदूंचे धार्मिक चिन्ह 'स्वस्तिक' आणि हिटलरच्या नाझी पक्षाचे चिन्ह 'हॅकेनक्रूझ'

### १०. हिंदूंच्या विरोधानंतर कायद्यात पालट झालेली काही उदाहरणे

विदेशातील कर्महिंदूंनी आधी उल्लेखित 'झीरो टॉलरन्स'चा धोका ओळखला. त्यांनी विरोधासाठी शक्य तेथे प्रयत्न चालू केले. ते यशस्वी होत असल्याची उदाहरणे –

अ. कॅलिफोर्निया : वर्ष २०२२ मध्ये असेंब्ली बिलच्या प्राथमिक मसुद्यात स्वस्तिक प्रदर्शनावर सरसकट दंड आकारण्याचा प्रस्ताव होता. 'कोअलिशन ऑफ हिंदूज ऑफ नॉर्थ अमेरिका' आणि 'हिंदु अमेरिकन फाऊंडेशन' यांसारख्या संघटनांनी त्याला विरोध केला.

आ. कॅनडा : डिसेंबर २०२५ मध्ये हाऊस ऑफ कॉमन्सच्या 'न्याय आणि मानवाधिकार स्थायी समिती'ने कायद्यात दुरुस्तीद्वारे नाझी चिन्हासाठी 'स्वस्तिक' या शब्दाचा वापर करणे वगळले. आता कायदा केवळ 'हाकेनक्रूझ'ला लक्ष्य करतो.

इ. व्हर्जिनिया : एप्रिल २०२६ मध्ये कायद्यानुसार नाझींच्या द्वेषपूर्ण चिन्हांच्या सार्वजनिक प्रदर्शनावर बंदी घालतांनाच हिंदु, बौद्ध, जैन आणि मूळ निवासी (इंडिजिनस) समुदाय यांच्यासाठी स्वस्तिकचे धार्मिक महत्त्व मान्य करून त्याला कायदेशीर संरक्षण दिले.

### ११. हिंदु विद्यार्थ्यांचा संघर्ष

याच काळात अमेरिकेतील अनेक सरकारी शाळांमध्ये नाझींच्या द्वेषपूर्ण चिन्हांच्या संबंधाने अत्यंत कडक धोरण लागू आहे. स्वस्तिक वापरणाऱ्या विद्यार्थ्यांना वारंवार निलंबित केले जाणे, त्यांच्यावर 'द्वेषयुक्त भाषण' (हेट स्पीच) केल्याचा आरोप होणे किंवा शिक्षकांकडून त्यांचा उघड अपमान होणे चालू झाले. हिंदु विद्यार्थ्यांनी याविरुद्ध पावले उचलली. हा या संघर्षाचा सर्वांत लक्षणीय भाग आहे. त्यांनी शाळा, मंडळे आणि प्रशासक यांच्याकडे पाठपुरावा करत 'धार्मिक स्वस्तिक'वरील बंदी हटवण्यासाठी अन् जागृती करण्यासाठी शालेय नियमावली अद्ययावत् करून घेतली.

अ. कायदे पालटासाठी न थांबता शालेय स्तरावर संघर्ष करणारे विद्यार्थी : गेल्या १२ ते १८ मासांत अमेरिकेतील विद्यार्थीचलित शालेय मोहिमा या 'स्वस्तिक' चिन्ह मूळ रूपात परत मिळवण्याच्या आंदोलनाचा मुख्य भाग बनल्या आहेत. हिंदु, बौद्ध आणि जैन धर्मांचे प्रतिनिधित्व करणारे हे विद्यार्थी तेथील पहिल्या किंवा दुसऱ्या पिढीतील रहिवासी आहेत. ते आता केंद्रीय कायद्यांची वाट न पहाता स्थानिक शाळांच्या धोरणांमध्ये पालट घडवून आणण्यासाठी थेट पावले उचलत आहेत.

आ. विद्यार्थ्यांच्या मोहिमांमुळे एका वर्षात प्राप्त यश : वर्ष २०२५-२०२६ या काळात लक्षणीय यश मिळालेल्या मोहिमांची उदाहरणे –

१. मीरा त्रिवेदी या १५ वर्षांच्या हिंदू हायस्कूल विद्यार्थिनीने तिच्या शालेय जिल्हा क्षेत्रात अत्यंत शिस्तबद्ध मोहीम राबवली. समवयस्क आणि कुटुंबीय यांना धार्मिक प्रतिकांवरून शाळांकडून होणारा त्रास पाहिल्यानंतर तिने स्थानिक समुदायाच्या मार्गदर्शकांच्या साहाय्याने शालेय मंडळासमोर एक सादरीकरण केले. परिणामी शालेय प्रशासनाला त्यांच्या द्वेषयुक्त चिन्हांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पुनरावलोकन करणे भाग पडले. शाळेने त्यांच्या शिक्षक प्रशिक्षण वर्गांमध्ये सुधारणा केली.

२. मॅरीलँडमधील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्थानिक सरकारी शाळांमधील पूर्वग्रह दूर करण्यासाठी विद्यार्थी संघटना स्थापन करून शालेय मंडळांकडे यशस्वीपणे याचिका प्रविष्ट केल्या.

३. ह्युस्टन आणि डॅलस येथील हायस्कूल अन् विद्यापीठ यांमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन 'नो युवर राईट्स (तुमचे हक्क जाणून घ्या)', अशा मोहिमांचे आयोजन केले. शालेय मंडळांशी वाद घालण्याऐवजी या विद्यार्थ्यांनी दिवाळी आणि नवरात्र यांसारख्या मोठ्या सणांपूर्वीच शाळेच्या प्राचार्यांना माहितीपत्रके अन् शैक्षणिक साहित्य वाटले. यामुळे शाळांमध्ये होणारे निलंबन किंवा वस्तू जप्त करण्याचे प्रकार जवळपास शून्य झाले. इ. विद्यार्थ्यांची रणनीती : हा संघर्ष करतांना विद्यार्थ्यांनी उचललेली पावले, म्हणजे त्यांनी अवलंबिलेली रणनीती अभ्यासनीय आहे.

१. चुकीच्या कारणाने नाझी संबंधोण्यात आल्याने होत असलेला मानसिक त्रास सांगणे.

२. 'हाकेनक्रूझ'चा खरा इतिहास आणि 'स्वस्तिक'संबंधाने वस्तूस्थिती मांडणे.

३. धोरणात्मक पालट करण्याची मागणी करणे. यासाठी ते शाळांच्याच नियमांचा आधार घेत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, एखाद्या विद्यार्थ्याला त्याच्या कल्याणाचे धार्मिक प्रतीक वापरण्यापासून रोखणे, हे शाळेच्या सांस्कृतिक सर्वसमावेशकतेच्या वचनबद्धतेचे उल्लंघन आहे. हिंदु आणि बौद्ध विद्यार्थी त्यांच्या शाळांमधील ज्यू विद्यार्थी संघटनांसह सक्रीयपणे सहयोग करत आहेत. ते संघटितपणे एकत्र येऊन प्रशासनाला दाखवून देतात, 'पवित्र स्वस्तिकाचे रक्षण केल्याने ज्यूविरोधी किंवा नाझीवादाविरुद्धच्या लढ्याला कोणताही धक्का पोचत नाही.

### १२. संघर्षातून बोध

अ. १० वर्षांपूर्वीची संस्थात्मक विरोधाचा सामना करावा लागणारी कठीण परिस्थिती पालटून आज एक सक्रीय आणि सुसंघटित जागतिक चळवळ उभी राहिली आहे. आज स्वस्तिक समर्थकांनी त्रास झाल्यानंतरच बचावाच्या ऐवजी काही होण्याचा धोका वाटत असतांनाच करायच्या प्रबोधनावर भर दिला. त्यामुळे जागृती पसरत आहे.

आ. पाश्चात्त्य देशांत जन्मलेल्या हिंदु विद्यार्थ्यांमुळे या चळवळीला नवी गती मिळाली आहे.

इ. नेमकी, अभ्यासपूर्ण आणि योग्य सूत्रे मांडली जात आहेत. उदाहरणार्थ 'हिटलरने त्याच्या 'माइन काम्फ' पुस्तकात 'स्वस्तिक' हा शब्द कधीही वापरला नव्हता. त्याने स्पष्टपणे 'हाकेनक्रूझ' (हुक्ड क्रॉस) हाच शब्द वापरला, तर दुसऱ्या महायुद्धानंतरच्या इंग्रजी भाषांतरांनी मात्र 'नाझी स्वस्तिक' हा चुकीचा समानार्थी शब्द सिद्ध केला', हे स्वस्तिक समर्थकांनी दाखवले.

### १३. अद्याप संघर्ष चालू असलेली क्षेत्रे

अजूनही स्वस्तिक संबंधाने अनेक ठिकाणी अस्पष्टता आणि स्थानिक पातळीवर कायदेशीर लढाया चालू आहेत. काही ठिकाणी कायदे पालटत असले, तरी त्यांची योग्य कार्यवाही एक मोठा संघर्ष ठरत आहेत. त्याची काही उदाहरणे –

अ. स्वित्झर्लंडमध्ये प्रसारमाध्यमे आणि कायद्याचे मसुदे 'हाकेनक्रूझ'चा स्पष्ट उल्लेख करण्याऐवजी सतत 'सार्वजनिक स्वस्तिक प्रदर्शन' असा वापर करत आहेत. आ. युरोपियन युनियन आणि जर्मनी येथे दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेल्या कायद्यांनुसार स्वस्तिक प्रदर्शित करणे बेकायदेशीर आहे. 'हाकेनक्रूझ' आणि 'हिंदु स्वस्तिक' यांतील भेद ओळखण्यासाठी पोलिसांना प्रमाणित प्रशिक्षण नाही. शालेय पाठ्यपुस्तके आणि स्वयंचलित 'इंटरनेट मॉडरेशन अल्गोरिदम'मध्ये या २ चिन्हांची सरमिसळ होण्याची मोठी शक्यता असते. 'एआय' (कृत्रिम बुद्धीमत्ता) फिल्टर स्वस्तिक हे चिन्ह सरसकट द्वेषयुक्त भाषण म्हणून ओळखण्यासाठी प्रोग्राम केलेले असतात.

विदेशात धर्माने अत्यंत अल्पसंख्य असतांनाही संघर्ष करणाऱ्या या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांना दंडवत ! त्यांच्या प्रयत्नांना ईश्वर यश देईलच. संघर्षासाठी ईश्वर त्यांना पूर्ण शक्ती आणि दिशा देत राहो. सर्व संतांचे आशीर्वाद त्यांच्यासह कायम राहोत, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना !

**डॉ. दुर्गेश सामंत,** गोवा

# नार्व्याचा श्री सप्तकोटीश्वर




गोमांतकात ज्ञानेश्वरांच्या काळापर्यंत कदंब घराण्याचे राज्य होते. अनेक देवदेवतांची सुंदर सुंदर मंदिरे ठिकठिकाणी होती. गर्द झाडी, त्यातून खळाळणाऱ्या नद्या, लगतच्या सह्याद्रीवरून कोसळणारे धबधबे आणि अशा या नंदनवनाहूनही सुंदर असलेल्या गोमांतकावर राज्य करणारे कदंबराजे हे सुसंस्कृत, कलाप्रिय आणि तेवढेच शूर होते. थोडेसे का होईना पण त्यांचे आरमारही होते.

या कदंब घराण्याची जी राजदैवते होती, त्यात दिवडी येथे सप्तकोटीश्वर शंकराचेही मंदिर भव्य आणि अतिसुंदर होते. कदंब राजे स्वतःला 'गोपकपट्टणाधिपती सप्तकोटीश्वर लब्ध वरप्रसाद' अशी पदवी अत्यंत अभिमानाने मिरवीत असत. पुढे कदंबांची राजवट यादवांनी बुडविली आणि नंतर यादवांची राजवट सुलतानांनी बुडविली. आधी विजापूरच्या आदिलशाहाच्या ताब्यात गोवा गेला. त्यांच्याकडून वास्को-द-गामा या पोर्तुगीज दर्यावर्दी सरदाराने १५ फेब्रुवारी १५१० या दिवशी गोवा जिंकून घेतले.

तेव्हापासून पोर्तुगीज सत्ता ही गोव्यात मूळ धरून बसली. या पोर्तुगीजांना धर्मवेड लागलेलं होतं. स्वधर्माचा म्हणजेच ख्रिश्चॅनिटीचा प्रचार करण्याचा त्यांना क्रूर छंद जडला होता. सत्ता स्थिरावल्यावर त्यांनी इ.स. १५६५ या वर्षी योजनापूर्वक गोमांतकातील साडेसहाशे मंदिरे फोडली. असंख्य लोक सक्तीने बाटविले. अनेकांनी आपापल्या देवमूर्ती मोठ्या धाडसाने लपतछपत पळविल्या आणि सध्याच्या फोंडे महालात ठिकठिकाणी त्या स्थापिल्या. या छळवादाला गोमांतकीय लोक थरथरा कापत असत. हा छळवाद जेथे चाले त्याला म्हणत 'व्होडलेघर'. म्हणजे यमाचे घर!

इ.स. १५६५ च्या या जेसुईट कल्लोळात दिवडीला असलेला हा सप्तकोटीश्वरही सापडला. फिरंग्यांनी सप्तकोटीश्वराचे मंदिर पाडून टाकले आणि या देवाची जास्तीत जास्त अवहेलना करण्याकरिता वा या देवात देव नाही हे दाखवून देण्याकरिता ते शिवलिंग शेताच्या बांधावर नेऊन ठेवले. त्यात हेतू असा की, जाणाऱ्या-येणाऱ्यांचेही पाय त्या देवाला लागावेत. ही परिस्थिती इ.स. १६०५ पर्यंत या देवाची होती. ती १६०५ मध्ये साखळीच्या सूर्यराव देसाई यांच्या प्रयत्नाने थोडी पालटली आणि त्यावेळच्या गोव्याच्या गव्हर्नरने देसायांना डिचोलीतील नार्वे येथे जांभ्याच्या खडकात लहानशा कोनाड्यात हा देव नेऊन ठेवाव्यास परवानगी दिली.

खडकात कोनाडा कोरून सप्तकोटीश्वराची स्थापना देवाच्या भक्तमहाजनांनी आणि देसाई यांनी केली. ती जागा आणि तो कोनाडा आजही अस्तित्वात आहे. या कोनाड्यासमोरच नारळीच्या झावळ्यांचा मांडव घालून देवाची अर्चना करण्याची रीत सुरू झाली. प्राचीन भव्य मंदिर गेले; उरले ते झोपडीसारखे देऊळ किंवा देवळासारखी झोपडी.

शिवाजीराजे नार्व्यास आले आणि त्यांनी आपला तळ या मंदिरानजीकच जंगलात ठोकला. ते स्वतःही नित्यनैमित्तिक श्रींची अर्चना करीत होते. एके दिवशी महाराज श्रींसमोर पूजेसाठी बसले. स्थानिक पुजारी पूजेचे मंत्र सांगत होता. एवढ्यात वाऱ्याची जरा मोठी फुंकर देवापुढच्या झावळ्यांच्या मांडवावर पडली. त्यातील एक झावळी सटकन निखळली आणि पूजा करीत असलेल्या शिवाजीराजांच्या अंगावर पडली. बाकी झाले काहीच नाही, पण देवाच्या अंगावरचे फूल सहज ओंजळीत पडावे तशी ही मांडवावरची झावळी राजांच्या अंगावर पडली. तेव्हा तो पुजारी राजांस म्हणाला, 'महाराज! श्री सप्तकोटीश्वराने आपणांस प्रसाद दिला आणि आज्ञाही दिली की, आपण येथे श्रींचे मोठे कायमस्वरूपी मंदिर बांधावे.'

महाराजांच्या मनात सप्तकोटीश्वराचे मंदिर बांधण्याचे विचार घोळतही असतील इतकंच काय, पण अवघी गोमांतक भूमी स्वतंत्र करून सुंदर करावी हाही विचार त्यांच्या मनात होताच की! पण महाराजांनी पुजाऱ्याचा अन्वयार्थ आनंदाने मनावर घेतला आणि खरोखरच नजीकच जमीन साफ करून मंदिर बांधाव्यास राजांनी प्रारंभही केला. पुढे गोव्याची मोहीम साधली नाही म्हणून महाराज नार्व्याहून परतले. मंदिर मात्र बांधून पूर्ण झाले. मंदिरावरती महाराजांच्या नावाचा शिलालेख कोरला गेला:

श्री सप्तकोटीश शके १५९० किलकाब्दे कार्तिक कृष्ण पंचम्यां सोमे श्रीशिवराज्ञा देवलयस्य प्रारंभः।।

या दिवशी इंग्लिश तारीख होती, दि. १३ नोव्हेंबर १६६८. हा शिलालेख खोदताना मात्र एक लहानशी चूक झाली, लेखात 'शुक्रवार' ऐवजी 'सोमवार' घातला गेला.

# मेंदू निरोगी ठेवण्यासाठी.....

मेंदू हे संपूर्ण शरीराचा नियंत्रणकेंद्र आहे. विचार करणे, निर्णय घेणे, आठवणी साठवणे, भावना व्यक्त करणे, शरीराच्या हालचाली नियंत्रित करणे आणि दैनंदिन जीवनातील प्रत्येक कृतीचे नियोजन करणे ही सर्व कामे मेंदू करत असतो. त्यामुळे मेंदूचे आरोग्य चांगले असेल तर शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्यही उत्तम राहते,

मेंदूचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेशी आणि दर्जेदार झोप घेणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्तींनी दररोज किमान ७-८ तास झोप घेणे आवश्यक आहे. झोपेच्या काळात मेंदूमध्ये दिवसभर साचलेले चयापचयातील अपायकारक पदार्थ बाहेर टाकण्याची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे घडते. स्मरणशक्ति मजबूत करणे, नवीन माहितीचे दीर्घकालीन संचयन करणे आणि मेंदूच्या पेशींना विश्रांती देणे ही महत्त्वाची कामे झोपेतच होतात. सातत्याने अपुरी झोप घेतल्यास एकाग्रता कमी होणे, निर्णयक्षमता बिघडणे आणि दीर्घकाळात स्मृतिभ्रंशा सारख्या विकारांचा धोका वाढू शकतो.

सकाळी १०-१५ मिनिटे नैसर्गिक सूर्यप्रकाशात राहिल्याने शरीरातील जैविक घड्याळ संतुलित राहण्यास मदत होते. यामुळे मेलॅटोनीन आणि इतर जैविक संप्रेरकांचे संतुलन सुधारते, मन प्रसन्न राहते आणि रात्रीची झोप अधिक चांगली लागते. नियमित सूर्यप्रकाशामुळे व्हिटॅमिन डीची निर्मितीही होते, ज्याचा अप्रत्यक्ष फायदा मेंदूच्या आरोग्यालाही होतो.

नियमित व्यायाम हा मेंदूसाठी औषधासारखा मानला जातो. विशेषतः स्क्वॅटस्सारखे पायांच्या मोठ्या स्नायूंना कार्यरत ठेवणारे व्यायाम रक्ताभिसरण सुधारतात. त्यामुळे मेंदूपर्यंत प्राणवायू आणि पोषक घटकांचा पुरवठा अधिक प्रभावीपणे होतो.

वजन उचलण्याचे किंवा स्नायू बळकट करणारे व्यायाम केल्याने शरीरात काही जैविक घटक तयार होतात, जे मेंदूतील मज्जापेशींच्या कार्यक्षमतेला चालना देतात. संशोधनानुसार नियमित शक्तिवर्धक व्यायामामुळे. स्मरणशक्ती, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता आणि संज्ञानात्मक कार्यक्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते.

**संकलन : प्रविण सरवदे**

# पौराणिक ग्रंथात उल्लेख असलेले विदर्भातील प्रख्यात वकील

## दादासाहेब खापर्डे यांची आज जयंती

दादासाहेब उपाख्य गणेश श्रीकृष्ण खापर्डे हे विदर्भाच्या इतिहासातील विलक्षण चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्त्व होते. त्यांची बुद्धीमत्ता चतुरस्त्र होती. ते विदर्भातील नामवंत वकील होते.त्यांना वेदांत, ज्योतिष्यशास्त्र, अध्यात्म वगैरे विषयात रस होता. याशिवाय नाटक, काव्य, संगीत, नृत्य , सामाजिक कार्य यांत ते रंगत. त्यांचे वक्तृत्व विलक्षण प्रभावी होते. हे एक भारतीय वकील, विद्वान, राजकीय कार्यकर्ते आणि शिर्डीचे साईबाबा आणि संत गजानन महाराज यांचे प्रख्यात भक्त होते.

दादासाहेब खापर्डे यांचे वडील इंग्रजी सैन्यात पुरवठा खात्यात कारकुनी करीत होते, त्यासाठी त्यांची सतत एका गावाहून दुसऱ्या गावी फिरती चालत असे. दादासाहेबांचा जन्म वऱ्हाडमधल्या इंगरोली या गावात २७ ऑगस्ट १८३४ मध्ये झाला. त्यांचे बालपण अमरावती व नागपुरात गेले. अवांतर वाचनाची दांडगी हौस असल्याने दादासाहेबांचे क्रमिक अभ्यासाकडे लक्ष नसे. अकोल्याहून ते दुसऱ्या प्रयत्नात मॅट्रिकची परीक्षा पास झाले. पुढचे बी.ए.चे शिक्षण मुंबईतल्या एल्फिन्स्टन महाविद्यालयात घेतले. तेथे असताना त्यांनी संस्कृत आणि इंग्रजी वाङ्मय अभ्यासले होते. पुढे कायद्याची एल्एल.बी. ही परीक्षा पास झाल्यानंतर ते वऱ्हाडात इ.स. १८८५ ते १८९० या सालांत, आधी अमरावतीत सरकारी वकील, नंतर मुन्सिफ या पदावर, व नंतर उपायुक्त झाले. नोकरीचा कंटाळा आला म्हणून ती सोडून देऊन ते अमरावतीतच वकिली करू लागले.

आपल्या प्रभावी वक्तृत्वामुळे दादासाहेब अमरावतीत लोकप्रिय झाले होते. त्यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रांत काम करायला सुरुवात केली. अमरावती म्युनिसिपालिटीत ते १६ वर्षे उपाध्यक्ष होते. टिळकांशी संबंध आला म्हणून सरकारने त्यांना उपाध्यक्षपदावरून दूर केले. इ.स. १८९७ मध्ये अमरावतीला भरलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाच्या स्वागत समितीचे ते अध्यक्ष होते. कलकत्त्यात काँग्रेसने भरवलेल्या शिवजयंती उत्सवात ते टिळकांबरोबर हजर होते. टिळकांचे एकनिष्ठ विश्वासू सहकारी असल्याने, दादासाहेब खापर्डे हे लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व बिपिनचंद्र पाल या त्रयीचे नेतृत्व असलेल्या काँग्रेसमधल्या जहाल गटात सामील होते. त्यांच्या कणखर व असामान्य व्यक्तिमत्त्वाचा मध्य प्रांतात दरारा असल्याने तेथे ते वऱ्हाडचे नबाब म्हणून ओळखले जात. दादासाहेब खापर्डे हे लंडनमधल्या प्रिव्ही काउन्सिलमध्ये इ.स. १९०८ ते इ.स. १९१० या काळात चाललेल्या टिळकांवरच्या खटल्यात त्यांचे वकील होते.



खापर्डे हे इ.स.१९१६ मध्ये लोकमान्य टिळकांनी काढलेल्या इंडियन होम रूल लीगच्या संस्थापक-सदस्यांपैकी एक होते. देशाच्या कारभारात सुधारणा सुचविणाच्या निमित्ताने भारताच्या व्हॉइसरॉयला भेटायला गेलेल्या काँग्रेसच्या समितीमध्ये ते होते. मे, इ.स. १९१९ ते जानेवारी, इ.स. १९२० या काळात खापर्डे यांचा मुक्काम इंग्लंडच्या संयुक्त संसदीय समितीत आपली बाजू मांडण्यासाठी इंडियन होम रूल संघाचे प्रतिनिधी म्हणून लंडनमध्ये होता. त्या काळात त्यांनी लंडनमध्ये अनेक जाहीर सभांमध्ये भाषणे केली. भाषणांदरम्यानचे त्यांचे हावभाव, त्यांचा नर्म विनोद आणि हजरजबाबीपणा पाहून इंग्लंडच्या काही वृत्तपत्रांनी त्यांची तुलना मार्क ट्वेन यांच्याशी केली.

सभांमध्ये भाषणे देण्याच्या निमित्ताने दादासाहेबांचा पुण्या-मुंबईशी आणि नाट्यक्षेत्राशी संबंध आला. अमरावतीला गेल्यावर दादासाहेब खापर्डे यांनी ह.ना. आपटे यांच्या कांचनगडची मोहना, जयध्वज आणि त्राटिका या नाटकांच्या जातीने तालमी घेतल्या होता. पुण्यात त्यांची 'नाट्यकला प्रवर्तक' आणि शाहू नगरवासी' या नाटक कंपन्यांशी जवळचा संबंध प्रस्थापित झाला. बालगंधर्व म्हणजे नारायणराव राजहंसांशी त्यांची मैत्री झाली. बालगंधर्व जेव्हा जेव्हा अमरावतीला यायचे तेव्हा दादासाहेब खापर्डे यांच्याकडेच उतरायचे.

प्रत्यक्ष रंगभूमीशी दादासाहेबांचा कधीच संपर्क आला नसला तरी एक कलोपासक म्हणून त्यांनी नाव कमावले होते. त्याकाळी महाराष्ट्रात नाट्यचळवळ नुकतीच बाळसे धरू लागली होती. महाराष्ट्रातील तमाम नाट्यसंस्था आणि कलापथके यांना एकत्र आणण्याची कल्पना दादासाहेब खापर्ड्यांनी मांडली आणि यशस्वी केली. त्यातूनच नाट्यसंमेलनाची संकल्पना पुढे आली. नाट्यसंस्थांतील अनेक दिग्गजांची मुंबईला बैठक झाली; अमरावतीला खास आमंत्रण धाडून दादासाहेबांना बैठकीसाठी बोलावले होते. आणि बैठकीत ठरल्याप्रमाणे पहिल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ दादासाहेब खापर्डे यांच्या गळ्यात पडली.

दादासाहेब खापर्डे शिर्डीच्या साईबाबांचे भक्त होते. डिसेंबर इ.स. १९१० मध्ये ते साईबाबांना भेटले आणि त्यानंतर इ.स. १९१८ पर्यंत त्यांनी त्यांच्या शिर्डाrभेटीच्या हकीकती रोजनिशीत नोंदून ठेवल्या आहेत. त्या नोंदींवरून साईबाबांची दिनचर्या, त्यांचे आयुष्य व त्यांचे काम कसे चाले यांवर पुरेसा प्रकाश टाकता आला आहे. शेगावच्या गजानन महाराजांविषयीच्या 'गजानान विजय' या ग्रंथातही त्यांचा उल्लेख आहे. दादासाहेब खापर्डे हे अंजनगाव सुर्जीच्या भालचंद्रनाथ महाराजांचे निःस्सीम भक्त होते. गजानन महाराज व साईनाथ महाराज हे भालचंद्रनाथांना 'बडे भय्या' मानत. दादासाहेब खापर्डे यांच्या देवनाथ मठाशी असलेल्या ऋणानुबंधामुळेच १९०८ यावर्षी लोकमान्य टिळक अकोल्याला जातांना वाटेत देवनाथ मठात आले. यावेळी भालचंद्रनाथ महाराज व लोकमान्यांची चर्चा झ्राली. भालचंद्रनाथ महाराज यांनी मध्य प्रांतात इंग्रजी सत्तेविरुद्ध आणि मिशनऱ्यांच्या धर्मांतराविरुद्ध केलेले अभूतपूर्व कार्य हे लोकमान्य टिळक जाणून होते. लोकमान्य टिळक आणि भालचंद्रनाथ महाराज यांची ही भेट अविस्मरणीय आणि एकूणच स्वदेशी चळवळीला पूरक ठरली.

दादासाहेब खापर्डे यांनीr आपल्या आयुष्यात अनेक मानसन्मान व पुरस्कार मिळवले, अनेक जबाबदार पदांवर काम केले. स्वातंत्र्यपूर्व काळात डिस्ट्रिक्ट काउन्सिलचे ते पहिले आणि पुढे अनेक वर्षे अध्यक्ष होते. ते इ.स. १९०५ साली मुंबईत भरलेल्या पहिल्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते. १ जुलै, इ.स. १९३८ रोजी दादासाहेब खापर्डे यांचे निधन झाले. त्याचे चिरंजीव बाळकृष्ण खापर्डे हेही वकील आणि राजकीय पुढारी होते.

# परदेशी विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी योग्य वेळ

जगभरातील विविध विद्यापीठांमध्ये अंदाजे १२ ते १३.३ लाख भारतीय विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत. त्यात प्रामुख्याने कॅनडात अंदाजे ४.२७ लाख,अमेरिकेत अंदाजे ३.६३ लाख,युनायटेड किंग्डम मध्ये अंदाजे १.७३ लाख विद्यार्थी शिकत आहेत. ऑस्ट्रेलिया आणि जर्मनी हे पण पर्यायी देश म्हणून विद्यार्थी निवडत आहे. पण मागील तीन वर्षांपासून यात घट होताना दिसते. वर्ष २०२३ मधील ८.९४ लाखावरून २०२५ मध्ये ६.१९ लाखापर्यंत पोहोचली. ही घट प्रामुख्याने भूराजकीय तणाव,परदेशातील शिक्षणाचा वाढता खर्च आणि शिक्षणानंतर तिथे लगेच चांगली नोकरी मिळण्याबाबत अडचणी,व आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी व्हिसा नियम आणि वर्क परमिट नियमात केलेले बदल हे आहेत. आता परदेशात शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घसरत असताना याचा फायदा भारतातील उच्च शैक्षणिक संस्थांनी घेतला पाहिजे,जेणेकरून आपल्या देशातून विदेशात जाणारा पैसा वाचेल. वर्ष २०२३-२०२४ मध्ये भारतीय विद्यार्थ्यांच्या परदेशातील शिक्षणावर दरवर्षी अंदाजे २९ हजार कोटी रुपयांहून अधिक परकीय चलन खर्च झाले होते.

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण (एआयएसएचई) अहवालानुसार, भारतातील परदेशी विद्यार्थ्यांची संख्या गेल्या पाच वर्षांत सातत्याने वाढत आहे. वर्ष २०१९-२० मध्ये जिथे ४८,८९८ परदेशी विद्यार्थी होते, तिथे २०२३-२४ मध्ये ही संख्या वाढून ५८,१३४ झाली आहे. ही वाढ जवळपास १६ टक्के आहे आणि जवळपास जगातील १७३ वेगवेगळ्या देशांमधून हे परदेशी विद्यार्थी आलेले आहेत. भारतात शिकण्यासाठी



येणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांमध्ये सर्वात मोठा वाटा नेपाळचा आहे. एकूण परदेशी विद्यार्थ्यांपैकी,एकट्या नेपाळमधून २४.१ टक्के, त्याखालोखाल संयुक्त अरब अमिरातीमधून ७ टक्के, अमेरिकेतून ५.९ टक्के, बांगलादेशातून ५.९ टक्के, नायजेरियातून ५.५ टक्के आणि झिम्बाब्वेमधून ४ टक्के विद्यार्थी आहेत. अहवालानुसार,या कालावधीत मुले आणि मुली अशा दोन्ही श्रेणीमध्ये परदेशी विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. परदेशी मुलांची संख्या ३२,३८६ वरून वाढून ३७,२९५ झाली आहे, तर परदेशी मुलींची संख्या वाढून २०,८३९ वर पोहोचली आहे.

भारत सरकारने स्टडी इन इंडिया उपक्रम आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत २०३० पर्यंत दोन लाख परदेशी विद्यार्थ्यांना भारतात आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.२०२५ च्या जागतिक विद्यापीठ क्रमवारीनुसार पहिल्या १०० सर्वसमावेशक जागतिक विद्यापीठांमध्ये भारताचे एकही विद्यापीठ नाही, अश्या परिस्थितीत, आता हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी भारताने काय केले पाहिजे?

भारताची 'स्टडी इन इंडिया' या उपक्रमाचा उद्देश परदेशी विद्यार्थ्यांना भारतात उच्चशिक्षणासाठी आकर्षित करणे होय.यात परदेशी विद्यार्थ्यांना भारतात कमी खर्चात दर्जेदार शिक्षण मिळते तसेच गुणवंत परदेशी विद्यार्थ्यांना १०० टक्के पर्यंत शैक्षणिक शुल्क माफी आणि स्कॉलरशिप दिली जाते. पण फक्त शैक्षणिक शुल्कात सवलत देऊन परदेशी विद्यार्थ्यांची संख्या वाढणार नाही तर अजून काय करणे आवश्यक आहे?

परदेशी विद्यार्थ्यांना उच्च मानांकित पदव्या हव्या असतात.त्यासाठी जागतिक दर्जाचा अभ्यासक्रम व तो पण आंतरराष्ट्रीय स्तराची सुसंगत हवा असतो. विद्यापीठांनी केवळ थेअरी न शिकवता प्रॅक्टिकल आणि संशोधनाला जास्त महत्त्व दिले पाहिजे. दीर्घकालीन निधीची कमतरता,खऱ्या प्रभावापेक्षा प्रकाशनाच्या संख्येवर असलेला प्रचंड पद्धतशीर भर आणि कमी संदर्भ दर, यामुळे भारतीय विद्यापीठे जागतिक संशोधन गुणवत्तेत लक्षणीयरीत्या मागे आहेत. भारतात सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) सुमारे १.२ टक्के उच्च शिक्षणावर खर्च करतो, जे जागतिक सरासरी ४.५ टक्कापेक्षा खूपच कमी आहे. विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तराची पायाभूत सुविधा, अत्याधुनिक प्रयोगशाळा उपकरणे आणि पुरेसा निधीचा अभाव आहे. त्यामुळे भरीव निधीची तरतूद उच्च शिक्षणासाठी असली पाहिजे. विद्यार्थी-प्राध्यापक गुणोत्तर जास्त असल्यामुळे प्राध्यापकांवर शिकवण्याचा मोठा भार पडतो आणि सखोल संशोधनासाठी त्यांना फारच कमी वेळ मिळतो. त्यामुळे विद्यापीठातील रिक्त पदे लवकरात लवकर भरणे जरूरीचे ठरते. परदेशी विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक सोयींनी युक्त आंतरराष्ट्रीय हॉस्टेल उभारणे गरजेचे आहे.

तसेच विद्यार्थ्यांना स्थानिक भाषेत अडचण येऊ नये म्हणून कॅम्पसमध्ये इंग्रजी माध्यमाचा प्रभावी वापर आणि मदत केंद्रे असावीत. त्याचबरोबर परदेशी विद्यार्थ्यांना जलद गतीने व्हिसा मिळण्याची प्रक्रिया राबविली गेली पाहिजे. शिक्षण सुरू असताना पार्ट-टाइम नोकरी आणि शिक्षण संपल्यावर काही वर्षे भारतात वर्क परमीटची परवानगी मिळायला हवी.

'स्टडी इन इंडिया' उपक्रमाचा मुख्य उद्देश भारताला जागतिक स्तरावर एक प्रमुख शैक्षणिक केंद्र म्हणून प्रस्थापित करणे आणि याद्वारे देशाचा सांस्कृतिक व राजनैतिक प्रभाव वाढवणे हा आहे.

परदेशी विद्यार्थी हे भारतीय विद्यापीठात शिकण्यास आल्याने त्यांच्या शिक्षण शुल्कातून शैक्षणिक संस्थांना भरीव निधी प्राप्त होतो,ज्यामुळे त्यांना पायाभूत सुविधा आणि शैक्षणिक सोयीसुविधा वाढवण्यास मदत होते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी शिक्षण शुल्क, निवास आणि विविध राहणीमानाचा खर्च भागवताना भारतात परकीय चलन आणतात. परकीय चलनाच्या या प्रवाहामुळे भारताच्या परकीय चलन साठ्यात वाढ होते.

परदेशी विद्यार्थी भारतात शिकून आपल्या देशात परतल्यावर भारताचे अनधिकृत ब्रँड ॲम्बेसिडर (सदिच्छादूत) बनतात.या विद्यार्थ्यांपैकी अनेक जण भविष्यात आपल्या देशात राजकारणी, राजनैतिक अधिकारी किंवा उच्च पदस्थ अधिकारी बनतात, ज्यामुळे भारताचे त्या देशांसोबतचे संबंध अधिक दृढ होतात.

विद्यापीठांच्या जागतिक आणि राष्ट्रीय क्रमवारीसाठी कॅम्पसमध्ये 'आंतरराष्ट्रीय विविधता' असणे हा एक महत्त्वाचा निकष असतो. परदेशी विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढल्यास भारतीय शिक्षण संस्थांची जागतिक पत आणि प्रतिष्ठा उंचावण्यास मदत होते. भारतीय आणि परदेशी विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक संवाद होतो. आपल्या विद्यार्थ्यांनाही जागतिक स्तरावरील विद्यार्थी आणि त्यांची संस्कृती शिकण्याचा अनुभव मिळतो. एकंदरीत,जागतिक बदलत्या भू-राजकीय तणावाचा फायदा घेऊन उच्च शैक्षणिक संस्थांनी जास्तीत जास्त परदेशी विद्यार्थी आपल्याकडे आकर्षित करण्याची हीच योग्य वेळ आहे,हे नक्की, पण तो ते घेतील का,हा येणारा काळच ठरवेल.

**प्रा.संजय त्रिंबकराव खडक्कार,**
माजी तज्ज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ.

# सिटी न्यूज अकोला

३

गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# अडगांव खुर्द श्री लक्ष्मी देवी यात्रेत महाप्रसादाला भाविकांचा उसळला जनसागर

## पौराणिक परंपरा जपलेल्या यात्रेची यशस्वी सांगता

प्रतिनिधी २७ ऑगस्ट





**अकोट :** अकोट तालुक्यामधील अडगांव खुर्द हे गाव श्री लक्ष्मी देवी यात्रेत महाप्रसादासाठी जनसागर उसळला होता. मिरवणुकीत महिला सांप्रदायिक भजन हे विविध वेशभूषा व पथनाट्य सादर करतात अरबळी भजनी मंडळ हे मिरवणुकीचे खास आकर्षण ठरते ढोल नगाऱ्या सहित टाळ मृदुंग दिंड्यांचा सहभाग असतो सर्व दिंड्यांचा आयोजक मंडळी तर्फे शाल श्रीफळ व मानधन देऊन सन्मान केला.

गावामध्ये सर्व महिला भगिनींना महाप्रसादाला पोळ्या करण्यासाठी आटा दिला जातो व सर्व पोळ्या केल्यानंतर गावामधून सजवलेल्या बैल गाड्या मध्ये सर्व पोळ्या पूजन करून मंदिरात भंडारा मध्ये आणल्या जातात, मिरवणूक मंदिर प्रणांगणात आल्यावर सर्व अरबळी भजनी मंडळ दहीहंडी काल्याचे किर्तन होते महाप्रसाद हा दुपारी १ वाजता पासून सुरुवात केली जाते.

सभा मंडपामध्ये भाविकांना महाप्रसाद बसून घेण्याची प्रथा येथील तरुण पिढी व विश्वस्त आयोजक महाप्रसादाचे वाढण्याचे नियोजन करतात यात्रेमध्ये भाविक महाप्रसादाकरचा दर्शन बारी लागते या यात्रेचे खूप मोठे प्रस्थ व कच्चा पातोळीच्या भाजीचे महत्त्व मानले जाते प्रत्येक भाविक प्रसाद म्हणून या भाजीला आपल्या घरी नेतात, भाविक दूर दूर वरून या यात्रेत पंचक्रोशीतून दाखल होतात व महाप्रसादाचा लाभ घेतात, या गावांमध्ये हिंदू मुस्लिम सर्व धर्म समभावाचे एकरूप एकतेचे दर्शन घडले. पोलिस बंदोबस्त होता.

# पावसातही ईद-ए-मिलाद-उन-नबी मिरवणुकीत उत्साह; 23 मंडळांचा सहभाग



वि. प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अकोट :** अकोट शहरात ईद-ए-मिलाद-उन-नबी निमित्त काढण्यात आलेल्या भव्य व शिस्तबद्ध मिरवणुकीने धार्मिक एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि उत्साहाचे दर्शन घडविले. सकाळपासून सुरू असलेल्या संततधार पावसालाही न जुमानता मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. अबालवृद्धांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि धार्मिक घोषणांमुळे संपूर्ण शहर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला होता.

शहरातील विविध २३ मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदवत आकर्षक सामाजिक व धार्मिक देखावे सादर केले. विविध मंडळांच्या माध्यमातून पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या शिकवणीचा संदेश देणारे तसेच समाजप्रबोधन करणारे देखावे नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. पावसाच्या सरी सुरू असतानाही सहभागींचा उत्साह कायम राहिल्याने मिरवणुकीला विशेष रंगत प्राप्त झाली.

मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी अकोट शहर पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्यासह अधिकारी व पोलीस अंमलदारांनी पावसातही कर्तव्य बजावत मिरवणुकीवर बारकाईने लक्ष ठेवले.

शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत मिरवणूक शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. मिरवणुकीच्या संपूर्ण मार्गावर नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकार्याची भूमिका निभावली. विविध समाजघटक, सर्वधर्मीय नागरिक तसेच सामाजिक संघटनांच्या सहभागामुळे धार्मिक सलोखा आणि परस्पर सौहार्दाचे सुंदर दर्शन घडले.

# ईद मिलादुन्नबी निमित्त भव्य जुलूस



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**आलेगाव :** इस्लाम धर्माचे शेवटचा संदेष्टा हजरत पैगंबर मोहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जेयंतीनिमित्त आलेगाव व परिसरात ईद मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त गावातून भव्य जुलूस-ए-मोहम्मदी काढण्यात आला. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत हा जुलूस शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. यावेळी गावातील मुख्य मशीद आणि प्रमुख चौक आकर्षक विद्युत रोषणाई व सजावटीने उजळून निघाले होते. मुख्य मशिदीत धार्मिक कार्यक्रम, कुरआन पठण व विशेष दुआनंतर जुलूसाला सुरुवात झाली. सहभागी मुस्लिम बांधवांनी हातात इस्लामिक ध्वज घेत "नारे-ए-तकबीर, अल्लाहू अकबर", "सरकार की आमद, मरहबा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला.

# गोवंश मांस विक्रीवर पोलिसांचा छापा; 55 किलो मांसासह दोन सुरे जप्त

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहरातील सिद्धार्थनगर परिसरात गोवंश मांसाची विक्री होत असल्याची माहिती मिळताच मूर्तिजापूर शहर पोलिसांनी धडक कारवाई करीत दोन ठिकाणी छापे टाकले.

या कारवाईत एकूण ५५ किलो गोवंश मांस, दोन लोखंडी सुरे आणि इतर साहित्य असा सुमारे ११ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धार्थनगरातील शेख अशफाक यांच्या घरासमोर एका व्यक्तीकडून गोवंश मांसाची विक्री सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पंचांसह घटनास्थळी छापा टाकला.

पहिल्या कारवाईत आरिफ अहमद गुलाम रसूल (३४, रा. खडकपुरा, मूर्तिजापूर) याच्याकडून २५ किलो गोवंश मांस, एक लोखंडी सुरा असा ५ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी कलम ३२५ तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

"कायद्यात राहाल, तर फायद्यात राहाल." शहरात अवैध व्यवसाय करणाऱ्यांनी कायद्याचे पालन करून आपले व्यवसाय करावेत. विशेषतः गोमांसाची बेकायदेशीर विक्री अथवा वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा ठाणेदार धर्मेश जोशी यांनी दिला.

## पातूर नगरपरिषदेमध्ये खळबळ उडविणारा निर्णय!

**पातूर :** अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेत राजकीय खळबळ उडवून देणारा निर्णय समोर आला आहे. नवनिर्वाचित नगरपरिषद सदस्य मोहम्मद शाकीर मोहम्मद साबीर यांना जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सदस्यपदासाठी अपात्र ठरवलं आहे. १२ सप्टेंबर २००१ नंतर तीन अपत्ये असल्याचा आरोप करत शेख खैराती शेख रफिक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवर सुनावणी घेत १७ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी अपात्रतेचा आदेश दिला. मात्र, मोहम्मद शाकीर यांनी हे आरोप फेटाळून लावत तिसरं अपत्य आपलं नसून भावाचं असल्याचा दावा केला आहे.

# रोहित्रावर काम करताना कंत्राटी कामगाराचा मृत्यू

## विद्युत विभागाच्या हलगर्जीपणाचा बळी?

**अकोट :** बोर्डी येथील भवानी विद्युत रोहित्रावर काम करत असताना कंत्राटी कामगार संतोष प्रल्हाद इंगळे (४५) यांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. काम सुरू असताना वीजप्रवाह पुन्हा सुरू झाल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात असून, विद्युत विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विद्युत रोहित्रावर काम करण्यापूर्वी वीजपुरवठा पूर्णपणे बंद ठेवणे हा सुरक्षेचा मूलभूत नियम असताना कामादरम्यान वीजप्रवाह सुरू कसा झाला, याबाबत संताप व्यक्त होत आहे. विजेचा धक्का इतका भीषण होता की इंगळे यांच्या एका हाताचा पंजा तुटल्याचे समोर आले आहे.

ही घटना केवळ अपघात नसून निष्काळजीपणाचा परिणाम तर नाही ना, असा सवाल उपस्थित होत आहे. मृताच्या कुटुंबीयांनी संपूर्ण घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# पातूर पोलीस स्टेशन हद्दीत चोरट्यांचा धुमाकूळ

## ग्रामीण भागात पाच बकऱ्यांची चोरी

प्रतिनिधी २७ ऑगस्ट




**पातूर :** पातूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बोडखा येथे चार, भंडाराज येथे तीन तर कापशी येथे पाच बकऱ्यांची चोरी झाल्याची माहिती समोर आली आहे. यासोबतच परिसरातील सात शेतकऱ्यांची केबल वायर चोरीला गेल्याने चोरट्यांचा धुमाकूळ सुरू असल्याचे चित्र आहे.

ऑगस्ट महिन्यात बकरी चोरीची ही चौथी घटना असल्याचे सांगण्यात येत असून, वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे पशुपालक आणि शेतकरी चिंतेत आहेत. शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा आधार असलेल्या शेळ्या-बकऱ्यांची चोरी होत असल्याने आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे.

दरम्यान, शेतातील विद्युत पंपांसाठी वापरण्यात येणाऱ्या केबल वायरचीही चोरी होत असल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे राहिले आहे. रात्रीच्या वेळी शेतात जाण्यास शेतकरी धजावत नसून, आपल्या मालमत्तेच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असताना चोरट्यांवर पोलिसांचा वचक राहिला आहे का, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या घटनांमुळे पातूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, चोरीच्या घटनांचा तपास करून चोरट्यांना तातडीने जेरबंद करण्याची मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

पोलिस प्रशासनाने या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन रात्रीची गस्त वाढवावी, संशयितांवर नजर ठेवावी तसेच चोरीच्या घटनांचा छडा लावून शेतकरी व नागरिकांना सुरक्षिततेचा विश्वास द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पातूरमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात साजरी



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**पातूर :** शहरात मुस्लिम बांधवांच्या वतीने पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा देण्यासाठी आरआरसी न्यूज नेटवर्कचे संचालक पंकज भाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आरआरसी न्यूज चॅनलचे पातूर तालुका प्रतिनिधी प्रदीप काळपांडे यांनी मुस्लिम बांधवांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

यावेळी आरआरसी नेटवर्क व आरआरसी इंटरनेट सेवा यांच्या वतीने मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलादच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि शांततेचा संदेश देत हा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

# पुरस्कारप्राप्त अन्वर खान यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार




प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** तालुका प्रतिनिधी

पुरस्कारप्राप्त पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते अन्वर खान हनीफ खान यांचा आमदार हरीश पिंपळे व उपजिल्हाधिकारी संदीप कुमार अपार यांच्या हस्ते सत्कार लक्षेश्वर संस्थान येथे करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करताना आमदार हरीश पिंपळे यांनी अन्वर खान यांच्या सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. सत्काराला उत्तर देताना अन्वर खान म्हणाले, "गोरगरीब आणि गरजूंसाठी काहीतरी चांगले करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी काम सुरू केले आहे. माझ्या हातून समाजासाठी चांगले कार्य घडावे, हाच माझा प्रामाणिक उद्देश आहे. यावेळी नवनियुक्त उपजिल्हाधिकारी शिल्पाताई बोबडे, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, शहर ठाणेदार अजित जाधव, ग्रामीण ठाणेदार दीपक महाडिक, नगराध्यक्ष हर्षल साबळे, अपर तहसीलदार गिरजादेवी, बांधकाम अभियंता दीपाली बजाज, वीज वितरण कंपनीचे अभियंता अजय कदम, वैद्यकीय अधीक्षक डॉ. राजेंद्र नेमाडे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अभियंता जंजाळ मॅडम, नंदकिशोर राऊत, लक्षेश्वर संस्थानचे अध्यक्ष राजू दहापुते, त्रिलोक महाराज, नजाकत पटेल यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त अकोला कच्छी मेमन जमाततर्फे शासकीय रुग्णालयाला पाच नवीन दंतचिकित्सा उपकरणांची भेट

## गरीब व गरजू रुग्णांच्या उपचारासाठी होणार उपयोग

प्रतिनिधी २७ ऑगस्ट




**अकोला :** ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने अकोला कच्छी मेमन जमाततर्फे जनसेवेची परंपरा पुढे नेत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथे पाच नवीन हाय-स्पीड डेंटल हँडपीस, मॉडेल 401-B2 ही दंतचिकित्सा उपकरणे भेट देण्यात आली. या उपकरणांचा उपयोग रुग्णालयाच्या दंतचिकित्सा विभागात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांसाठी करण्यात येणार आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोलाचे अधिष्ठाता डॉ. संजय सोनुने यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात अकोला कच्छी मेमन जमाततर्फे ही पाचही दंतचिकित्सा उपकरणे रुग्णालय प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली. हा सेवाभावी उपक्रम डॉ. आसिफ हालरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी अधिष्ठाता डॉ. संजय सोनुने, प्राध्यापक तथा दंतशास्त्र विभागप्रमुख डॉ. दिनेश नैताम, सहयोगी प्राध्यापक डॉ. गौरव पिंपळे, सहाय्यक प्राध्यापक डॉ. अब्दुल कहार कुरेशी, डॉ. नाजनीन मलक तसेच डॉ. सुमैया उपस्थित होत्या. डॉ. संजय सोनुने यांनी अकोला कच्छी मेमन जमातीच्या पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत करून रुग्णालयाला पाच दंतचिकित्सा उपकरणे उपलब्ध करून दिल्याबद्दल जमातीचे आभार मानले. अशा प्रकारच्या सहकार्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांना अधिक चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

### सेवाकार्य यापुढेही सुरू राहणार

जमातीचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी सांगितले की, संस्थेचा उद्देश प्रसिद्धी किंवा दिखावा नसून गरजू नागरिकांची सेवा करणे आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी पार पाडणे हा आहे. शासकीय रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या गरीब व गरजू रुग्णांच्या गरजा लक्षात घेता यापुढेही अशाच प्रकारे सेवाभावी कार्य सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.

### दंतचिकित्सेसाठी महत्त्वाची उपकरणे

भेट देण्यात आलेली हाय-स्पीड डेंटल हँडपीस ही दंतचिकित्सेमध्ये वापरली जाणारी महत्त्वाची उपकरणे आहेत. दातांचा खराब किंवा किडलेला भाग काढणे, उपचारासाठी दातांची तयारी करणे तसेच विविध दंतचिकित्सा प्रक्रियांमध्ये या उपकरणांचा उपयोग केला जातो. या पाच नवीन उपकरणांमुळे दंतचिकित्सा विभागाच्या सुविधांना अधिक बळकटी मिळणार आहे.

### जमातीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित

कार्यक्रमास जुलूस कमिटीचे अध्यक्ष हाजी मुदाम भाई, अकोला कच्छी मेमन जमातीचे अध्यक्ष जावेद जकरिया, सहसचिव वाहिद मुसानी, फारूक चौहान, सुफियान डोकाडिया, रियाज सूर्या, फैजान चह्वाण, मौलाना तफरीज हसन, मोहम्मद आतिफ मलक तसेच इमरान चह्वाण यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

### समाजाला देणारी संस्था म्हणून ओळख

अकोला कच्छी मेमन जमात समाजातील गरजू नागरिक तसेच शासकीय संस्थांना सहकार्य करण्यासाठी सातत्याने सेवाभावी कार्य करते. जमातीतर्फे यापूर्वीही शासकीय रुग्णालयाला व्हीलचेअर, स्ट्रेचर, ब्लँकेट, एस फिनायल, गमबूट्स आणि वॉटर चिलर मशीन यांसह विविध उपयोगी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय वर्षभर वैद्यकीय शिबिरे, आरोग्य तपासणी, औषधांची व्यवस्था तसेच गरजू रुग्णांच्या उपचारासाठी मदत केली जाते.

# अकोट शहरात अवैध दारू विक्री जोरात



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अकोट :** शहरात अनेक ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू असून, या प्रकारामुळे शहरातील दारू विक्रीच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे नियोजित वेळेआधीच देशी दारूची दुकाने उघडी राहत असल्याचे दिसून येत असताना, दुसरीकडे शहरातील विविध भागांत खासगी व्यक्तींकडून अवैध दारू विक्री होत असल्याची चर्चा आहे.

सकाळीच देशी दारूची दुकाने उघडली जात असल्याने दारू विक्रीची नियोजित वेळ नेमकी कुणासाठी? असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित दुकानांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेला राज्य उत्पादन शुल्क विभाग याकडे गांभीर्याने दखल का घेत नाही, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

**अवैध दारू विक्रीवर अंकुश ठेवणार कोण?**

शहरातील अनेक भागांत परवानाधारक दुकानांव्यतिरिक्त अवैध पद्धतीने दारू विक्री होत आहे. जर ही विक्री सुरू असेल, तर त्यावर अंकुश ठेवण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई का होत नाही? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

विशेष म्हणजे अवैध दारू विक्री करणाऱ्यांकडे दारूचा साठा येतो तरी कुठून? अवैध दारू विक्रेत्यांना साठा पुरवते कोण? या प्रश्नाचा शोध घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

## 'खेलो इंडिया संवाद युवा कनेक्ट'

**अकोला :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त माय युवा भारत यांच्या वतीने 'खेलो इंडिया संवाद - युवा कनेक्ट' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयात करण्यात आले.

## नाव बदल जाहीरनामा

मी, Shahebaz Mohummad Shafi Surayya (**शहबाज मोहम्मद शफी सुरैया**), रा. महागाव, याद्वारे जाहीर करतो की माझे नाव यापुढे **Mo Shahbaj Mo Shafi Suraiyya (मो. शहबाज मो. शफी सुरैया)** असे राहील. यापुढे माझ्या सर्व शासकीय, पासपोर्ट, कायदेशीर, शैक्षणिक, बँकिंग व इतर सर्व अभिलेखांमध्ये माझे नाव **Mo Shahbaj Mo Shafi Suraiyya (मो. शहबाज मो. शफी सुरैया)** असे नमूद करण्यात यावे आणि हे नाव माझे वैद्य नाव म्हणून ग्राह्य धरावे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# दारूसाठी पैसे न दिल्याने बापाने केला मुलाचा खून

प्रतिनिधी २७ ऑगस्ट



**बाभूळगाव** : दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याने जन्मदात्या पित्याने आपल्याच दिव्यांग मुलाचा कुऱ्हाडीने खून केला. ही हृदयविदारक घटना बुधवारी (दि. २६ ऑगस्ट) दुपारी साडेबाराच्या सुमारास बाभूळगाव तालुक्यातील सरूळ येथे घडली.

अरविंद भीमराव मेश्राम (वय ३०) असे मृतकाचे नाव असून, भीमराव मारोती मेश्राम (वय ७१) असे आरोपी बापाचे नाव आहे. अरविंद जन्मतः दिव्यांग असल्याने तो पलंगावरच खिळून होता. त्याला आई आणि भाऊ यांची मदत लागत असे. निराधार योजनेतून त्याला शासकीय मदत मिळत होती. मात्र आरोपी भीमराव मेश्राम नेहमीच दारूसाठी मुलाकडे पैसे मागत असे.

बुधवारी दुपारी याच कारणाने बाप-लेकात वाद झाला. रागाच्या भरात भीमरावने कुऱ्हाड घेतली आणि अरविंदच्या डोक्यावर, डोळ्यांवर व गालावर जोरदार वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अरविंदचा जागीच मृत्यू झाला.

■ घटनेची तक्रार आई प्रेमिला भीमराव मेश्राम (वय ६५) यांनी बाभूळगाव पोलीस ठाण्यात नोंदविली. पोलिसांनी भीमराव मेश्राम याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करून तपासात घेतला आहे. अरविंदचा मृतदेह शवविच्छेदनसाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिपक आसकर करीत आहेत.

## पेट्रोल पंपावर ग्राहकांशी अरेरावी

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**कळंब** : तालुक्यातील डोंगरखर्डा येथील एका पेट्रोल पंपावर ग्राहकांना उद्धट वागणूक दिली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बुधवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास स्थानिक वृत्तपत्र प्रतिनिधी (पत्रकार) इंधन भरण्यासाठी गेले असता, पंपावरील कर्मचाऱ्याने "पटत असेल तर पेट्रोल टाक, नाहीतर निघून जा... तुझ्याने जे होते ते करून घे!" अशा शब्दांत अरेरावी केली.

या गैरप्रकाराचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले असून व्यवस्थापकांनी मध्यस्थीचा प्रयत्न केला; मात्र कर्मचारी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. घटनेनंतर तक्रार पुस्तिकेत नोंद करून क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा क्रमांक मागितला असता तो देण्यासही टाळाटाळ करण्यात आली.

या पंपावर पिण्याचे पाणी आणि स्वच्छतागृहासारख्या मूलभूत सुविधांचा मोठा अभाव आहे. पैसे देऊनही मिळणाऱ्या अशा वागणुकीमुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली जाणार आहे.

## मुकूटबनमध्ये जुलूस-ए-मोहम्मदी धार्मिक सलोख्याचे दर्शन



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**झरी जामणी** : मुकूटबन येथे बुधवारी ईद-ए-मिलादुन्नबी पारंपारिक पद्धतीने उत्साहात आणि आपसी भाईचाऱ्याच्या वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त नूरानी जामा मस्जिद येथून अकीदत व मोहब्बतीने जुलूस-ए-मोहम्मदी काढण्यात आला. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणाऱ्या या जुलूसचे ठिकठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

जुलूसची सुरुवात नूरानी जामा मस्जिद येथून होकर पशुवैद्यकीय दवाखाना मार्ग, गादेवार चौक, ग्रामपंचायत मार्ग, बसस्थानक चौक आदी मार्गांवरून पुन्हा जामा मस्जिद परिसरात समारोप झाला. सहभागी नागरिकांनी परचम फडकवत जयघोष केला. जुलूसमध्ये बालकांचा उत्साह विशेष लक्षवेधी होता.

नूरानी जामा मस्जिद कमिटीच्या व तीने उपसरपंच अनिल कुंटावार, ठाणेदार सतीश जाधव, पीएसआय सुदाम आसोरे, माजी सरपंच शंकर लाकडे, हाजी इकबालभाई, बापुराव जिन्नावार, सय्यद अजिज, सय्यद शफीयोद्दीन, अब्दुल मजीद, सय्यद इब्राहिम, हाफिज इश्तियाक आलम व मौलाना हमीद आलम यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

उपसरपंच अनिल कुंटावार यांच्या निवासस्थानी सहभागींसाठी नाश्ता, चहा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच माजी सरपंच शंकर लाकडे यांच्या वतीने ग्रामपंचायत परिसरात चहा-पाणी देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. इस्लाहुल मुस्लिमीन कमिटीने मक्का-मदिना येथील देखावे सादर केले. दुपारी जामा मस्जिद येथे हाफिज इश्तियाक यांनी फातेहा पठण करून देशात अमन, शांतता व एकतेसाठी प्रार्थना केली. सायंकाळी मुस्लिम समाजासाठी लंगरचे आयोजन करण्यात आले होते. शांतता व सुव्यवस्थेसाठी ठाणेदार सती श जाधव, पीएसआय सुदाम आसोरे, दीपक ताठे, दिलीप जाधव, प्रकाश गोर्लेवार, सुनील राठोड व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

## 'ज्ञान माऊली' कार्यक्रमाने भक्तिरसात

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**घाटंजी** : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जयंती वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने श्री संत जलाराम मंदिरात 'ज्ञान माऊली' सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात झाला. अभंग, भजन, नृत्य व नाट्यप्रयोगांनी वातावरण भक्तिमय झाले. नगराध्यक्ष परेशभाऊ कारीया अध्यक्षस्थानी होते. उपनगराध्यक्ष सोनल ठाकरे, माजी सभापती शैलेशभाऊ इंगोले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. बालकलाकारांनी संतांच्या जीवनावरील नाट्यप्रयोग सादर केले. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा' व ज्ञानेश्वर-नामदेव भेटीचा प्रसंग विशेष ठरला. संदीप बिजेवार, सलोनी सुक्ते, संतोष मानकर व धनंजय लोहटे यांनी अभंग सादर केले.

## सावळी सदोबा ग्रामपंचायतीत लाखोंचा गैरव्यवहार

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**आर्णी** : सावळी सदोबा ग्रामपंचायतीमध्ये १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून लाखोंचा अपहार झाल्याचा आरोप उपसरपंच व सदस्यांनी केला आहे. या प्रकरणी कारवाई करून रक्कम वसूल करण्यात यावी, अशी मागणी यवतमाळ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे (सीईओ) निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सन २०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत विविध कामांच्या नावाखाली बोगस बिले सादर करून हा गैरव्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार डस्टबीन खरेदीसाठी ७.०५ लाख, ब्लिचिंग पावडर व जलजीवन ड्रॉपसाठी १०.०५ लाख, नाली सफाईसाठी ७.७२ लाख, विद्युत साहित्यासाठी २.३४ लाख आणि मुरूम टाकण्याच्या कामासाठी १.७२ लाख खर्च दाखवण्यात आला आहे. नाली सफाई व इतर कामांमध्ये योग्य प्रक्रिया न पाळता, तसेच जिओ-टॅगिंग न करता ही बिले मंजूर करण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून निवेदनाच्या प्रती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार राजु तोडसाम व गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

## बाभुळगावात ईद-ए-मिलादुन्नबी; मक्का-मदिनेच्या प्रतिकृतीने वेधले लक्ष

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**बाभुळगाव** : इस्लाम धर्माचे अंतिम प्रेषित हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त बाभुळगावात ईद-ए-मिलादुन्नबी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. बुधवारी सकाळी ७ वाजता शहरातील जामा मस्जिद परिसरातून मुख्य मिरवणुकीला (जुलूस) सुरुवात झाली. या मिरवणुकीतील मक्का आणि मदिनेच्या सुंदर प्रतिकृतीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरत हुसेनशाह बाबा दर्गा येथे पोहोचली. तेथे फतेहा ख्वानी आणि महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



या मिरवणुकीत जामा मस्जिदचे मौलाना सलाउद्दीन, शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख शब्बीर खान, आरोग्य सभापती शेख कादर, नगर पंचायत गटनेते जाकीर खान, माजी नगरसेवक नईम खान, आरिफ खान, सैय्यद नूर, शेख कदीर, कादर घाची, शेख अहमद, शेख असिफ, शेख रियाज खान, रियाज, रसूल मिर्झा, शेख एजाज, करीम खान, सलीम खान, शारीक खान, अन्सार मिर्झा, अजमत मुल्ला, नूर खान, शेख शम्मी, आरिफ भाई, सैय्यद जावेद, फिरोज खान, शेख साबीर यांच्यासह मुस्लिम समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मोकाट कुत्र्यांचा हैदोस

### नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**पाटणबोरी** : पाटणबोरी येथे मोकाट कुत्र्यांनी हैदोस घातला असून गल्लीबोळांसह गावातील एकमेव मुख्य बाजारपेठेतही दिवसा-रात्री कुत्र्यांचे कळप फिरत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. भर रस्त्यावर कळपाच्या कळप बसत असल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे.

मोकाट कुत्र्यांमुळे लहान मुले, शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनी तसेच सकाळी व संध्याकाळी फिरायला जाणाऱ्या महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कुत्र्यांचे कळप अचानक इकडून तिकडे धावत असल्याने ते अंगावर येण्याची भीती नागरिकांना सतावत आहे. यापूर्वी अनेक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनाही घडल्या आहेत. दरम्यान, मागील वर्षी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून माजी सरपंच, उपसरपंच विनोद निम्मलवार व अनिल पुलोजवार यांच्या नेतृत्वाखाली गावातील मोकाट कुत्रे पकडून आदिलाबाद जिल्ह्यात नेऊन सोडण्यात आले होते. मात्र, वर्षभरातच गावात पुन्हा मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सध्याची परिस्थिती पाहता ग्रामपंचायतीने तातडीने मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करून त्यांना पकडण्याची व सुरक्षित ठिकाणी नेण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

## पुसदमध्ये ईद मिलादुन्नबीचा जुलूस

प्रतिनिधी २७ ऑगस्ट





**पुसद** : पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मदिनानिमित्त पुसद शहरात ईद मिलादुन्नबीचा जुलूस मोठ्या उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात काढण्यात आला. मुफ्ती नूर आलम रिझवी यांच्या सरपरस्तीखाली सकाळी नऊ वाजता जामा मस्जिद येथून जुलूसाला सुरुवात झाली.

जुलूस भजन घरासमोर पोहोचला असता डॉ. सुदेश, बिपिन चिद्दरवार व नंदू चौधरी यांनी मंदिरासमोर मौलानांचा सत्कार केला. या प्रसंगी हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामाजिक सलोखा व बंधुभावाचा संदेश दिला. तसेच सुभाष चौकात अंजुमन लोहार बिरादरीच्या वतीने मौलाना, नगरसेवक व कमिटी पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

शहरभरातील प्रमुख मार्गांवर मिठाईचे वितरण करण्यात आले असून, गढी मैदान येथे मुफ्ती नूर आलम रिझवी यांच्या दुवा-प्रार्थनेने जुलूसाची सांगता झाली. कार्यक्रमादरम्यान ईद मिलादुन्नबी कमिटीतर्फे उपविभागीय अधिकारी अमर मोहिते सिंह व ठाणेदार शिरसागर यांचा सत्कार करून पोलीस प्रशासनाचे आभार मानण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष खान मोहम्मद खान सनी व कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बाभूळगाव तालुक्यात विजेचा व्होल्टेज वाढणार

### ३३ केव्ही उपकेंद्राला डीपीसीची मंजुरी!

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**बाभूळगाव** : तालुक्यातील शेतकरी बांधवांना भेडसावणाऱ्या थकीत आणि अनियमित वीज समस्येवर अखेर तोडगा निघाला आहे. कोटांबा येथे नवी ३३ केव्ही क्षमतेची वीज उपकेंद्र उभारण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीत मंजुरीचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी हे आदेश दिल्याने तालुक्यातील कृषीपंपांना आता सुरळीत, पूर्ण व्होल्टेजने वीज मिळणार आहे.

तालुक्यात शेतीसाठी कृषीपंपांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. मात्र, सध्याच्या वीज वितरणावर अतिरिक्त ताण असल्याने वारंवार ट्रिपिंग आणि कमी व्होल्टेजचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत होता. कोटांबा येथील नवीन उपकेंद्रामुळे या समस्येतून कायमस्वरूपी सुटका होणार आहे.

■ शासनाने यापूर्वी शेतकरी कर्जमुक्ती आणि वीजबिल सवलतीच्या माध्यमातून दिलासा दिला आहेच, आता थेट वीज पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर दिला जात आहे. या निर्णयाबद्दल भाजपचे जिल्हा सचिव तथा राळेगाव विधानसभा संयोजक सतीश मानलवार यांनी मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांचे बाभूळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने विशेष आभार मानले आहेत.

याशिवाय, विरखेडे येथे २२० केव्ही क्षमतेचे भव्य सबस्टेशन प्रस्तावित असून त्याची टेंडर प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. कोटांबाचे ३३ केव्ही उपकेंद्र आणि विरखेडेचे २२० केव्ही सबस्टेशन या दोन्ही प्रकल्पांमुळे बाभूळगाव तालुक्याचा वीज पायाभूत आराखडा पूर्णपणे बदलून जाणार आहे.

## वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांसह अनेकांचा काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश

प्रतिनिधी २७ ऑगस्ट



**दारव्हा** : दारव्हा तालुक्यात काँग्रेस पक्षाला मोठे बळ मिळाले असून, दारव्हा तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. गोपालजी डहाके, सहसचिव ॲड. मंगेश कदम, सहदेव पवार सर, युवराज महल्ले, धीरज धावडे आणि किसन भणक यांनी सोमवार, २४ ऑगस्ट २०२६ रोजी यवतमाळ येथे काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष माणिकराव ठाकरे यांच्या यवतमाळ येथील निवासस्थानी हा प्रवेश सोहळा पार पडला. सर्वधर्मसमभाव व लोकशाही मूल्यांवर आधारित काँग्रेसची भूमिका समजून घेत आपण पक्षात प्रवेश करीत असल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले. या प्रवेशामुळे लोही जिल्हा परिषद वर्तुळात तसेच संपूर्ण तालुक्यात काँग्रेस पक्षात नवचैतन्य निर्माण झाले आहे. याप्रसंगी बोलताना ॲड. गोपाल डहाके यांनी आगामी काळात दारव्हा तालुक्यात पक्ष मजबूत करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करण्याची ग्वाही दिली. या प्रवेश सोहळ्याला दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गजानन बि बेकर, युवक काँग्रेस अध्यक्ष अतुल राऊत, रमेशराव ठक, बळीराम साबळे, रवि गजभिये, प्रमोद बगमारे, प्रकाश गोरडे, बंडू पाटील सरतापे, ॲड. योगेश ठाकरे, सुरेश राऊत, उमेश बुधे, संतोष बनकर, शंकर कटाने, विठ्ठल मुंदेकर, प्रदीप राऊत, संजय महल्ले व सनी आगळे यांच्यासह काँग्रेस आणि उद्धवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कंपोस्ट खत निर्मितीचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

### RAWE अंतर्गत कृषी विद्यार्थ्यांचा उपक्रम

प्रतिनिधी २७ ऑगस्ट




**पांढरकवडा** : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी महाविद्यालय, कोंघारा येथील सातव्या सत्रातील कृषी विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत बोरगाव (कडू) येथे शेतकऱ्यांना कंपोस्ट खत निर्मितीबाबत मार्गदर्शन केले.

सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासोबतच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी कंपोस्ट खताचे महत्त्व विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना समजावून सांगितले. शेतीतील अवशेष, जनावरांचे शेण, ओला कचरा तसेच अन्य सेंद्रिय पदार्थांचा वापर करून कंपोस्ट खत तयार करण्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून दाखवून दिली. रासायनिक खतांचा अतिरेक टाळून सेंद्रिय खतांचा योग्य वापर केल्यास जमिनीची गुणवत्ता सुधारते, पिकांची उत्पादकता वाढते आणि उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते, अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली. तसेच कंपोस्ट खतामुळे जमिनीची सुपीकता वाढण्याबरोबरच पाणी धरून ठेवण्याची क्षमता सुधारते, हेही त्यांनी स्पष्ट केले. या जनजागृती उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शेतकऱ्यांना कंपोस्ट खताचे फायदे आणि निर्मितीची योग्य पद्धत समजावून सांगितली. हा उपक्रम स्वयंम मिनपलवार, प्रसंजित दोनिपल्ली, दीक्षित जाधव आणि साहिल डंभारे यांनी यशस्वीरित्या पार पाडला.

## 'जय श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव समिती'ची कार्यकारिणी जाहीर

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**वणी** : येथील 'जय श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव समिती'ची बैठक पार पडली असून, वर्ष २०२६-२७ साठी अध्यक्षपदी ॲड. कुणाल विजय चोरडिया यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली आहे. या बैठकीत नूतन अध्यक्षांच्या अनुमतीने नवीन कार्यकारिणी व सल्लागार समिती जाहीर करण्यात आली.

समितीच्या उपाध्यक्षपदी शुभम मदान व श्याम लाहारिया, कार्याध्यक्षपदी राहुल मुंजेकर, सचिवपदी उमेश पोद्दार, कोषाध्यक्षपदी जयंत पांडे तर संयोजकपदी अमोल धानोरकर यांची निवड झाली आहे. प्रसिद्धी प्रमुख म्हणून आशिष सिसोदिया काम पाहणार असून सोशल मीडियाची जबाबदारी पार्थ त्रिवेदी आणि प्रिंट मीडियाची जबाबदारी सौरभ राजुरकर यांच्यावर सोपवण्यात आली आहे. याशिवाय १७ सदस्यांची वरिष्ठ सल्लागार समितीही गठीत करण्यात आली आहे.

आगामी काळात तीन दिवसीय जन्माष्टमी महोत्सव साजरा करण्यात येणार असून यात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, भव्य रॅली तसेच महिला समितीतर्फे भव्य नृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# रुग्णालयात इमर्जन्सीची व्यवस्था करण्यात येईल!

## आ. रवी राणा यांनी केली जिल्हा स्त्री रुग्णालयाची पाहणी

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवाला निर्देश देऊन ज्या ज्या विभागात इमर्जन्सीची आवश्यकता आहे, त्या-त्या ठिकाणी इमर्जन्सीची व्यवस्था करण्यात येईल, असे यावेळी आमदार रवी राणा यांनी सांगितले.



ते जिल्हा स्त्री रूग्णालयात घडलेल्या दुर्दैवी घटनेच्या पृष्ठभूमीवर सर्व विभागाची पाहणी करताना बोलत होते. यामध्ये एका आईने आपल्या जिवाचा तुकडा गमविला असल्यामुळे मुख्यमंत्री स्वत: या घटनेबद्दल गंभीर असून स्वत: जातीने लक्ष देत आहेत. अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे सुद्धा या घटनेसंदर्भात सतत फॉलोअप घेत आहेत , असेही आ.रवि राणा त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती बसवून याबाबत जोही अहवाल निघेल त्या अहवालातील दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. फायर ब्रिगेडच्या त्रुट्यांमुळे एवढी मोठी दुर्घटना घडल्याने फायर ब्रिगेडचे ऑडीट हे सर्व दवाखाने शासकीय व निमशासकिय दवाखाने तसेच इतर विभागामध्ये होणे आवश्यक असल्याचे आ.रवि राणा म्हणाले.

जिल्हा स्त्री रुग्णालयाला राजकीय अड्डा न बनविता सर्व राजकीय नेत्यांनी एकत्र मिळुन जिल्हा स्त्री रुग्णालय असो जिल्हा सामान्य रुग्णालय असो किंवा इतर शासकिय रुग्णालय असो या सर्व रुग्णालयांमध्ये संपुर्ण अमरावती जिल्ह्यातुन उपचाराकरिता येणाऱ्या गोर गरिबांसाठी चांगली आरोग्य व्यवस्था कशी होईल यावर लक्ष देऊन काम करण्याचा आ.रवि राणा यांनी दिला सल्ला

जिल्हा स्त्री रुग्णालयात स्फोट होवून झालेल्या दुर्घटनेत इतर निष्पाप नवजात शिशुंचे जीव वाचवणाऱ्या नर्सेसचे व कक्षसेविकांचे कौतुक त्यांनी केले. तसेच आमदार रवि राणा यांनी बुधवारी अपघातस्थळी भेट देऊन संपूर्ण विभागाची पाहणी केली. या घटनेतून धडा घेत भविष्यात एकाही निष्पाप जीवाला अशा प्रकारच्या दुर्घटनेला सामोरे जावे लागू नये, यासाठी शासन आणि प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षाही आ. रवि राणा यांनी व्यक्त केली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक विनोद पवार, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते नाना आमले, शिक्षण सभापती अॅड.प्रिती रेवणे, मिनी महापौर किशोर जाधव यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### रुग्णालयांचे फायर सेफ्टी यंत्रणेचे ऑडिट होणे आवश्यक

विशेषतः अग्निशमन यंत्रणेमध्ये असलेल्या त्रुटींमुळे एवढी मोठी दुर्घटना घडली असल्यास, केवळ एका रुग्णालयापुरती मर्यादित न राहता संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील शासकीय, निमशासकीय आणि इतर रुग्णालयांमधील फायर सेफ्टी यंत्रणेचे ऑडिट होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णालयांमध्ये अग्निशमन यंत्रणा, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, विद्युत व्यवस्था, ऑक्सिजन व व्हेंटिलेटर यंत्रणा आणि इतर सुरक्षा सुविधांची नियमित तपासणी झाली पाहिजे, अशी मागणीही त्यांनी केली.

# सुषमा अंधारे यांचा जिल्हाधिकाऱ्यांना घेराव

## पोलिसांचा मोठा बंदोबस्त ताफा



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात भेट देऊन ठिय्या मांडला.

त्यामुळे खळबळ उडाली यावेळी अमरावती पोलिसांचा मोठा पोलीस बंदोबस्त ताफा या ठिकाणी तैनात करण्यात आला होता. यावेळी सुषमा अंधारे यांनी अधिकाऱ्यांना चांगले धारेवर धरून त्यांच्याशी चर्चा केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य अधिकारी यांच्या बैठकीत शिवसेनेच्या उपनेते सुषमा अंधारे, दर्यापूरच्या आमदार गजानन लवटे, आमदार नितीन देशमुख यांनी यांची प्रामुख्याने उपस्थित होती. दोन तास या कार्यालयामध्ये ठिय्या मांडला.

या ठिकाणी डॉ. विनोद पवार यांनी उत्तर न दिल्यामुळे शिवसैनिक आक्रमक झाले होते.

सुषमा अंधारे यांनी वारंवार आरोग्य विभागीय आयुक्त काटकर यांना फोन केला असता ते हॉस्पिटलमध्ये आले नाही म्हणून स्वतः सूक्ष्म अंधारे व शिवसैनिक यांनी जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी सुरू असलेले समितीच्या बैठकीमध्ये स्वतः जबरदस्तीने प्रवेश केला.

या ठिकाणी मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये विविध सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे नुकताच विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागातर्फे आयोजित वाक्यात या मृद व जलसंधारण दिंडीमध्ये पहाटे सहा ते आठ पर्यंत सहभाग नोंदवला.




या अंतर्गत शिवाजी ग्राउंड वर मृदा व जलसंधारण विभागातर्फे Walkathon ही मृदा व जलसंधारण च्या निर्धारक करता विविध कार्यक्रम व दिंडी आयोजित केली. यामध्ये या महाविद्यालयाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी भरभरून सहभाग नोंदवला. यामध्ये विद्यार्थ्यांनी मृद व जलसंधारणाची घोषवाक्य या दिंडीमध्ये उद्घोषली. समारोपामध्ये शासनाच्या विभागामार्फत उपस्थित सहभाग्यांकरिता पारितोषिक वितरण झाले व यास शिवाजी संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन जी देशमुख तसेच अमरावती विभागीय आयुक्त श्रीमती नयना गुंडे यांची उपस्थिती लाभली.

यानंतर महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता परदेशी शिक्षणाच्या संधी व योग्यता याविषयीचे केसी ओव्हरसीस नागपूर या संस्थेचे उपाध्यक्ष श्री विपिन मुकादम यांचे सादरीकरण व व्याख्यान आयोजित केले होते.

# आजाद समाज पार्टीच्या महाराष्ट्र राज्य महासचिव पदी अॅड. संजय वानखडे यांची नियुक्ती

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** आजाद समाज पार्टीच्या महाराष्ट्र राज्य महासचिव पदी अॅडव्होकेट संजय वानखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



ही नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष खासदार अॅड. भाई चंद्रशेखर आजाद यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष – मनिष नलिनी पुं. साठे यांनी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहु महाराज आणि महात्मा ज्योतीबा फुले यांच्या संकल्पनेतील व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच मान्यवर कांशीराम यांच्या "बहुजन हिताय-बहुजन सुखाय" ही समानतेची विचारधारा पुढे नेण्यासाठी "आजाद समाज पार्टी (कांशीराम)" चे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. चंद्रशेखर आझाद यांच्या सुचनेनुसार तसेच महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष यांच्या नेतृत्वाखाली आपली ' महाराष्ट्र राज्य महासचिव या पदावर निवड करण्यात आली आहे.

आपणास दिलेली जबाबदारी पुर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडाल असा माझा पुर्ण विश्वास आहे. असे त्यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात नमूद आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे पक्षाची ताकद वाढली आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे.

# अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालय रामभरोसे?- सुषमा अंधारे

## लहान मुलांच्या जीवाशी खेळू नका"; भाजपच्या विकासकामांवरही अंधारेंचा सवाल

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात अतिदक्षता विभागात २४ जून रोजी घडलेल्या आगीच्या घटनेनंतर रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी रुग्णालयातील व्हेंटिलेटर, अग्निसुरक्षा यंत्रणा आणि देखभालीबाबत गंभीर आरोप केले आहेत.



२४ जून २०२६ रोजी विशेष शिशु अतिदक्षता विभागातील आगीत काही बालकांचा मृत्यू झाला. या घटनेची नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नसताना, व्हेंटिलेटरचे ऑडिट वेळेवर झाले होते का, ऑडिटनंतर आवश्यक बदल करण्यात आले होते का, तसेच उपकरणांच्या देखभालीची नोंद व्यवस्थित ठेवण्यात आली होती का, असे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आलेल्या निवेदनातही या मुद्द्यांवर थेट प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

अंधारे यांनी आरोप करताना म्हटले की, "जिल्हा स्त्री रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था रामभरोसे आहे. लहान मुलांच्या जीवाशी खेळू नका." व्हेंटिलेटरचे ऑडिट वर्षभर झाले नसल्याचा दावा करत त्यांनी घटनेला जबाबदार असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

निवेदनात व्हेंटिलेटरमध्ये स्पार्क किंवा शॉर्टसर्किट नेमके कशामुळे झाले, उपकरणामध्ये तांत्रिक दोष होता का, देखभालीचा अभाव होता का किंवा ऑक्सिजन सिलिंडरजवळील व्यवस्थेमुळे काही धोका निर्माण झाला होता का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित व्हेंटिलेटर कोणत्या कंपनीचे होते, ते कधी खरेदी करण्यात आले आणि त्यांची देखभाल कोण करत होते, याचाही तपशील मागविण्यात आला आहे. तसेच NICU/SNCU विभागातील ऑक्सिजन व्यवस्था, अग्निसुरक्षा यंत्रणा, फायर अलार्म आणि स्प्रिंकलर यंत्रणा प्रत्यक्षात कार्यरत होती का, याचीही चौकशी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. २०२२ मध्ये रुग्णालयातील व्हेंटिलेटरमध्ये स्पार्क झाल्याच्या घटनेचा संदर्भ देत त्यानंतर कोणती खबरदारी घेण्यात आली, उपकरणांमध्ये बदल करण्यात आले का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. अमरावतीतील गंभीर घटनेनंतर पालकमंत्री बावनकुळे यांच्या भूमिकेवरही त्यांनी टीका केली. "घटना घडल्यानंतर पालकमंत्री राजस्थानमध्ये आहेत," असा आरोप करत त्यांनी सरकारच्या संवेदनशीलतेवर प्रश्न उपस्थित केला. दरम्यान, पक्षाच्या निवेदनात स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करून तिचा कालावधी निश्चित करावा, अहवाल जाहीर करावा, उपकरण पुरवठादार व देखभाल करणाऱ्यांवर आवश्यक कारवाई करावी, तसेच मृत बालकांच्या कुटुंबीयांना ₹२५ लाखांची मदत देण्याबाबत विचार करावा, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

आता या सर्व आरोपांची आणि मागण्यांची शासन व रुग्णालय प्रशासनाकडून सखोल चौकशी होऊन वस्तुस्थिती समोर येणार का, दोषींवर कारवाई होणार का आणि नवजात बालकांच्या उपचारासाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था खरोखर सक्षम करण्यात येणार का, याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे. पत्र परिषदेला सुधीर सुरवंशी, आसावरी देशमुख, पराग गुडधे यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

### भाजपच्या विकासकामांवर अंधारेंचा सवाल

यावेळी सुषमा अंधारे यांनी भाजप सरकारवर राजकीय निशाणा साधत "हनुमान गडाच्या विकासासाठी २१ कोटींचा निधी दिला जातो; मात्र स्त्री रुग्णालयाला नऊ कोटी रुपये मिळत नाहीत, हा भाजपचा विकास आहे का?" असा सवाल केला.

### सभागृहात आणि रस्त्यावरही लढणार

या प्रकरणात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची लढाई थांबणार नसून सभागृहात तसेच सभागृहाबाहेरही हा मुद्दा लावून धरला जाईल, असे अंधारे यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

# ग्रामीण भागासाठी सण-उत्सव काळात डॉल्बी सिस्टीम प्रतिबंधात्मक मनाई आदेश जारी

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** येत्या काळात विविध धर्मीय सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक शांतता, पर्यावरण व सुरक्षिततेस बाधा उत्पन्न होऊ नये याकरिता जिल्ह्यातील ग्रामीण भागात आयोजित धार्मिक कार्यक्रमांदरम्यान डॉल्बी सिस्टीम लावून मिरवणुका काढण्यास डॉल्बी सिस्टीम मालक व चालकांसाठी अपर पोलीस अधिक्षक दत्ता तोटेवाड यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम 163 अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. 24 ऑगस्ट ते 3 सप्टेंबर 2026 पर्यंत हा आदेश लागू राहणार असून उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी साधणार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद

## 'विकसित भारत युवा कनेक्ट' उपक्रम; अमरावती जिल्ह्यातून एकमेव महाविद्यालय

प्रतिनिधी २७ ऑगस्ट




**अमरावती :** विकसित भारत युवा कनेक्ट या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय उपक्रमांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्हर्चुअल संवाद साधण्यासाठी अमरावती येथील पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची राज्यातील ३७ महाविद्यालयांमध्ये निवड झाली आहे. विशेष म्हणजे, अमरावती जिल्ह्यातून या उपक्रमासाठी निवड झालेले हे एकमेव महाविद्यालय आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याचे मानले जात असून, ही अमरावतीच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

या उपक्रमांतर्गत गुरुवार, दि. २७ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी व्हर्चुअल संवाद साधणार आहेत. सकाळी १० ते दुपारी ४ या कालावधीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सकाळी ११ वाजता पंतप्रधान विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

'विकसित भारत युवा कनेक्ट' हा भारत सरकारच्या युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालयाचा प्रमुख राष्ट्रीय उपक्रम आहे. 'विकसित भारत २०४७'च्या संकल्पनेशी देशातील युवकांना जोडणे, युवक व धोरणकर्त्यांमध्ये थेट संवाद निर्माण करणे तसेच शासन, तंत्रज्ञान, उद्योजकता आणि सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात युवकांचा सक्रिय सहभाग वाढविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. 'माय भारत' पोर्टलच्या माध्यमातून युवकांचा सहभाग वाढविण्यावरही भर देण्यात येत आहे. यंदा या उपक्रमात *"व्यसनमुक्त युवा, विकसित भारत"* या संकल्पनेवर विशेष भर देण्यात आला आहे. त्याअंतर्गत महाविद्यालये, विद्यापीठे व विविध शैक्षणिक संस्थांमध्ये युवासंवाद, कार्यशाळा व परिसंवाद आयोजित केले जात आहेत.

# मोहम्मद पैगंबर यांचा जन्म मानवजातीच्या कल्याणासाठी सुखकर - आ. सुलभा खोडके

## चांदणी चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे शाही जुलूसचे अभूतपूर्व स्वागत

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**अमरावती:** हजरत मोहम्मद पैगंबर यांनी मानवजातीला सत्य, न्याय, करुणा आणि परस्पर सन्मानाचा मार्ग दाखविला. त्यांच्या शिकवणुकीतून समाजात शांतता, सद्भावना आणि एकोपा निर्माण करण्याची प्रेरणा मिळते. त्यांचा जन्म हा संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी सुखकर ठरला, म्हणूनच जीवनात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे झालेल्या चुकांची क्षमायाचना करून सदाचाराचा मार्ग अवलंबित सर्वांनी विकासाच्या ध्येयाने प्रेरीत होऊन समृद्धीकडे वाटचाल करण्याचे आवाहन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले.



सालाबादाप्रमाणे ईद-उल-मिलादुन्नबीचा पर्व आज बुधवार दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वत्र साजरा करण्यात आला. अमरावती शहराच्या मुस्लिम बहुल भागातही जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीचा उत्साह दिसून आला. याप्रसंगी अमरावतीच्या आमदार - सौ. सुलभाताई खोडके व विधान परिषद आमदार - संजय खोडके यांनी जश्ने ईद -ए-मिलादुनब्बीच्या कार्यक्रमात सहभागी होऊन अनुयायांसमवेत समरस होऊन ईद-ए-मिलाद चा आनंद द्विगुणित केला.

ईद-उल-मिलादुन्नबीचा पर्व हा हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जन्माचा पर्व असून समाजाला अंधाराकडून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणारा पर्व आहे. शांती,सभ्यता, नीतिमत्ता व मानवतेची शिकवण देणारा हा एक लोकोत्सव आहे. ईद-ए-मिलादच्या या पवित्र पर्वातून प्रेम आणि एकतेचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावा, तसेच सर्व धर्मीयांमध्ये बंधुभाव अधिक दृढ व्हावा, अशी सदिच्छा विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी व्यक्त केली.

.दरम्यान ईद-ए-मिलादुन्नबीच्या पर्वावर मरकज मस्जिद मिस्कीन शाह मियाँ येथून भव्य जुलूस काढण्यात आला . दरम्यान चांदनी चौक परिसर स्थित आमदार - सौ.सुलभाताई खोडके जनसंपर्क कार्यालय समीप या भव्य शाही जुलूसचे आगमन झाले असता आमदार- सौ.सुलभाताई खोडके, आमदार - संजय खोडके यांनी मुस्लिम धर्माचे मौलवी यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करीत आशीर्वचन घेत त्यांना ईद-ए-मिलादुन्नबी च्या पावन पर्वावर शुभेच्छा दिल्या. यासोबतच पारंपारिक पद्धतीने वेशभूषा धारण केलेल्या चिमुकल्यांसह त्यांच्या पालकांना सुद्धा आमदार खोडके दाम्पत्यानी यावेळी शुभेच्छा दिल्या. हा जुलूस मार्गक्रमण करीत असतांना जागोजागी पुष्पवृष्टी करीत सहभागी अनुयायांचे स्वागत करण्यात आले. तसेच या पावन पर्वावर सर्व मुस्लिम समाज बांधवांना शुभेच्छा देत ईद-ए-मिलादुन्नबी च्या हर्षदायी पर्वात सहभागी विश्वकल्याणाची मनोकामना केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि. २७ ऑगस्ट २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## सारडाला लूटण्याचा छंद, खरेदी - विक्री बंद...



आदेश

मी शरद जरे, पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे मला महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी- विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ५-ड (४) (अ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार जय

Page 9 of 10

9/10

गजानन कृषी बाजार, ग.नं.१०, पंचाळा, हिंगोली-अकोला हायवे, वाशिम, जि. वाशिम यांना देण्यात आलेला खाजगी बाजार परवाना क्रमांक पीएमएल-७३/२०२१ रद्द करीत आहे.

१. सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्यापासून जय गजानन कृषी बाजार, वाशिम यांनी सदर खाजगी बाजार परवान्याच्या आधारे शेतमालाची खरेदी-विक्री, लिलाव किंवा अन्य कोणताही बाजार व्यवहार करू नये.

२.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही तात्काळ करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३.सदर आदेशाच्या दिनांकापर्यंत खाजगी बाजाराने केलेल्या व्यवहारांशी संबंधित बाजार शुल्क, देखरेख शुल्क, शासकीय देणी, शेतकऱ्यांना देय रक्कम किंवा इतर वैधानिक देणी असल्यास ती संबंधित कायदे व नियमांनुसार स्वतंत्रपणे वसूल करण्याची कार्यवाही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी करावी. सदर परवाना रद्द केल्यामुळे अशा वैधानिक देयकांपासून परवानाधारकास मुक्तता मिळणार नाही.

४.गैरअर्जदाराने वजनकाटा तपासणी/जप्तीच्या कार्यवाहीविरुद्ध S.C.C. No. ४८/२०२४ प्रकरण प्रलंबित असल्याचे नमूद केले आहे. सदर न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्याची नोंद घेण्यात येत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

(शरद जरे)
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**मापात पाप करणाऱ्या सारडा यांच्या जय गजानन कृषी बाजारात...**

# शेतकऱ्यांना लुटण्याची हद्द, परवाना केला रद्द!

## पणन संचालकांनी आदेश दिला खुद्द, शेतकऱ्याचे लुटारू असल्याचे सिद्ध

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम - हिंगोली महामार्गावर पंचाका हद्दीत असलेल्या सारडा यांल्या जय गजानन खाजगी कृषी बाजाराचा परवाना राज्याचे पणन संचालक शरद अरे यांनी दि: २१ ऑगष्ट २०१६ रोजी केला आहे. या आदेशान्वये जय गजानन खाजगी कृषी बाजारा वाशीम यांनी खाजगी बाजार परवान्याच्या अधारे शेतमालाची खरेदी-विक्री, लिलाव किंवा अन्य कोणताही बाजार व्यवहार करू नये असा इशाराही पणन संचालकांनी दिल्यामुळे मापात पाप करून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या 'कथित' खाजगी बाजाराच्या मालकासह त्याच्या पाठीराख्यांमध्ये खळबळ उडाल्याचे वृत्त आहे.

हिवरा-रोहिला ता. जि. वाशीम येथील जागरुक शेतकरी अभिषेक प्रदीपराव देशमुख यांनी जय गजानन खाजगी कृषी बाजार, वाशीम यांच्या नियमबाह्य व बेकायदेशीर कामकाजाबाबत राज्याच्या 'पणन संचालकांकडे दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजी तक्रार अर्ज सादर केला होता. या तक्रारीत अभिषेक देशमुख यांनी जय गजानन खाजगी बाजाराच्या कामकाजामध्ये शेतमालाची वजन प्रक्रिया, वजनकाट्याची अचूकता, शेतमालाची खरेदी-विक्री, बाजारातील पारदर्शकता, शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा, बाजारभावाचे प्रदर्शन, पावती व्यवस्था, व्यापारी व आडत्यांची संख्या, बाजार शुल्क, व इतर आकारणी, देखरेख शुल्क, वैधानिक अहवाल सादरीकरण, ऑनलाईन व्यवहार, व माहिती प्रणाली, परवाना अटीचे पालन, बाजारातील स्पर्धात्मक वातावरण तसेच शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण यासंबंधी विविध आक्षेप नेदिविले होते. या अनियमिततेच्या आधारे जय गजानन व कृषी बाजार, वाशीम यांचा खाजगी बाजार परवाना रद्द करण्याची मागणी केली होती.

या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, वाशीम यांच्या पत्रव्यवहारानुसार तसेच सक्षम प्राधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, वाशीम यांनी चौकशी करून दि. ९ ऑगष्ट २०१४ रोजी पणन संचालकांकडे अहवाल सादर केला. चौकशी दरम्यान अभिषेक देशमुख यांच्या तक्रारीतील विविध मुद्?यांची पडताळणी करण्यात आली. संबंधित कागदपत्रे, बाजार व्यवहाराची नोंद, हिशोबपट्ट?या, वजनकाट्यांशी संबंधित अभिलेख, परवाना अटी, अहवाल सादरीकरण, बाजारातील सुवीधा व इतर पुराव्यांचा विचार करण्यात आला, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशीम यांच्या चौकशी अह?वालातील १८ मुद्द्यापैकी एकूण १३ मुद्द्यांच्या अनुषंगाने गैरअर्जदारास सुनावणी नोटीस देण्यात आली होती.या प्रकरणात नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार अर्जदार तसेच गैरअर्जदार जय गजानन खाजगी कृषी बाजार, वाशीम यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी २ एप्रिल २०२५, ९ जानेवारी २०२६, २३ जानेवारी २०२६, १६ फेब्रुवारी २०२६, २७ फेब्रुवारी २०२६, १५ में २०२६, २२ मे २००६, १ जून २००६, ५ जून २०२६, आणि ८ जून २०२६ रोजी संधी देण्यात आली. त्यानुसार दोन्ही पक्षाने लेखी म्हणणे, खुलासे, कागदोपत्री पुरावे व युक्तिवाद सादर केले असल्याचे पणन संचालकांच्या दि. २१ ऑगष्ट २०१६ च्या जा क्र -पंणन ५ अ/जयगजानन /अह./सुना / आदेश /३३८६/२६ मध्ये नमूद करण्यात आले आहे.अंर्जदार व गैर गैर अर्जदार यांनी सादर केलेल्या लेखी म्हणणे खुलासे, कागदोपत्री पुरावे व युक्तिवादाच्या अनुषंगाने राज्याच्या पणन संचालकांनी काढलेल्या




निष्कर्षामध्ये जय गजानन कृषी बाजारातील ६०टन क्षमतेच्या प्लेट काट्याबाबत वैधमापनशास्त्र विभागाच्या तपासणीत गंभीर तफावत आढळून आली असल्याने सदर काटा जप्त करण्यात आला. सन २०२३-२४ मधील उपलब्ध व्यवहार नोंदीच्या तपासणीत सोयाबीनची काही खरेदी शासनाने घोषीत केलेल्या एमएसपी पेक्षा कमी दराने झाल्याचे निदर्शनास आले आहे.सदर माल नॉन-एफएक्यू असल्याचा गैरअर्जदाराचा बचाव संबंधित अधिकृत गुणवत्ता तपासणी, मान्यतेच्या पुराव्यांनी पुरेशा प्रमाणात समर्थित झाला नसल्याचा ठपका ही ठेवण्यात आला आहे. खाजगी बाजारास लागू असलेल्या वैधानिक अहवाल व माहिती सादरीकरणाच्या दायित्वांचे पूर्ण पालन झाल्याचे समाधानकारकपणे सिद्ध झाललेले नाही देखरेख शुल्काचा भरणा विहित मुदतीत न होता विलंबाने करण्यात आल्याचे चौकशी अहवालातून सिध्द आले आहे.कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशीम व खाजगी, बाजारातील संबंधित व्यक्तींच्या दुहेरी सहभागाची बाब बाजारातील स्पर्धात्मकता व परवाना अटींच्या अनुपालनाच्या संदर्भात गंभीरपणे विचारात घेण्यासारखी आहे. चौकशी दरम्यान चौकशी अधिकाऱ्यास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे यामुळे महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७मधील नियम ४ जे मधील नमूद कर्तव्य पार पाडण्यात बाजाराने कसूर केला आहे. पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेली रक्कम राखून न ठेवल्याने महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) नियम १९६७२मधील नियम ४ क (५) चे पालन केले नाही. या निरीक्षणांमुळे जय गजानन खाजगी कृषी बाजारामध्ये वजनकाट्यातील गंभीर तफावत, एमएसपी पेक्षा कमी दराने खरेदी व वैधानिक / परवाना अटीचे पालन न करने याबाबी स्वतंत्रपणे गंभीर स्वरूपाच्या आहेत. या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम लक्षात घेता खाजगी बाजार परवानाधारकाकडून अधिनियम, नियम व परवाना अटीचे अपेक्षीत - पालन होत नसल्याचेही या आदेशात पणन संचालकांनी नमूद केलेले आहे.

खाजगी कृषी बाजाराचा मूलभूत उद्देश हा शेतकऱ्यांना पर्यायी व पारदर्शक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, स्पर्धात्मक वातावरण निर्माण करने, शेतमालाला योग्य मोबद?ला मिळण्यास सहाय्य करने आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण करणे हा आहे. सदर उद्देशास बाधा आणणाऱ्या गंभीर व पुनरावृत्तीच्या स्वरूपात अनियमिता आढळून आल्यास परवाना कायम ठेवने हे शेतकरी हिताच्या दृष्टीने योग्य ठरणार नसल्याचे मत ही पणन संचालकांनी ११ ऑगष्ट २०१६ रोजी दिलेल्या आदेशात व्यक्त केलेले आहे.महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विधी (विकास व विनियमन) अधिनियम १९६३चे कलम ५-ड(४)(अ)अन्वये प्राप्त अधिकारानुसार जय गजानन कृषी बाजार, वाशीम यांना देण्यात आलेला खाजगी परवाना क्रमांक पीएमएल-७३/२०२१पणन संचालक शरद जरे यांनी रद्द केला आहे. सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्यापासून जय गजानन कृषि बाजार, यांनी सदर खाजगी बाजार परवान्याच्या आधारे शेतमालाची खरेदी-विक्री, लिलाव किंवा अन्य कोणताही बाजार व्यवहार करु नये असेही या आदेशात पणन संचालकांनी नमूद केले आहे. राज्याच्या पणन संचालकांच्या या आदेशाने ' कथित' खाजगी बाजार संचालकासह त्यांच्या पाठीराख्यामध्ये खळबळ उडाल्याचे समजते जागरूक शेतकरी अभिषेक देशमुख यांच्या यशस्वी लढ?याची शेतकऱ्या कडून कौतुक केल्या जात आहे.

---

## थोडक्यात

### सोयाबीन प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीतून आधुनिक शेतीतंत्राचा प्रसार



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशीम यांच्या वतीने राष्ट्रीय खाद्यतेलबिया अभियान तसेच भारतीय कृषी तंत्रज्ञान अनुसंधान प्रसार संस्थान, पुणे यांच्या सौजन्याने राबविण्यात येत असलेल्या तेलबिया प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत सोयाबीन पिक प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन मौजे जामखेड, ता. मालेगाव, जि. वाशीम येथे मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास कृषी विज्ञान केंद्राचे कृषीविद्या तज्ञ तुषार देशमुख, गृहविज्ञानशास्त्र तज्ञ शुभांगी वाटाणे, इझ्ध्संचालक संदीप पोफळे तसेच ग्रामपंचायत सदस्या सौ. लक्ष्मी मगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रयोगशील शेतकरी संदीप पोफळे यांनी प्रात्यक्षिकातून योग्य उत्पादन तंत्रज्ञान, निविष्ठांचा शास्त्रीय वापर आणि पीक व्यवस्थापनाबाबत उपयुक्त माहिती मिळाल्याचे सांगून कृषी विज्ञान केंद्र, वाशीमचे आभार मानले.कार्यक्रमास जामखेड व परिसरातील शेतकरी बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. प्रशिक्षण व प्रक्षेत्र भेटीच्या माध्यमातून शास्त्रीय सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष शेतपातळीवर प्रसार होण्यास मदत झाली.

---

### मेडशी येथे ईद-ए-मिलाद-उन-नबी उत्साहात;

## मिरवणुकीतून दिला शांतता व अमनचा संदेश





● सिटी न्युज ब्युरो @ मेडशी ●

**इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणारा ईद-ए-मिलाद-उन-नबी हा पवित्र सण मेडशी येथे बुधवारी (दि. २६ ऑगस्ट) मोठ्या उत्साहात, आनंदात आणि शांततामय वातावरणात साजरा करण्यात आला.**

यानिमित्त मुस्लिम बांधवांच्या वतीने गावातून शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान ग्रामस्थांना मिठाईचे वाटप करून बंधुभाव, एकोपा, शांतता आणि अमनचा संदेश देण्यात आला.इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचा जन्म रबी-अल-अव्वल महिन्याच्या १२ तारखेला झाल्याचे मानले जाते. त्यांच्या जन्मदिनानिमित्त जगभरातील मुस्लिम समाजाकडून ईद-ए-मिलाद-उन-नबी साजरी केली जाते. पैगंबर मोहम्मद यांनी मानवतेला प्रेम, दया, बंधुभाव, शांतता आणि परस्पर सन्मानाचा संदेश दिला. याच विचारांचा जागर करत मेडशी येथेही हा उत्सव भक्तिभावाने आणि सामाजिक सलोखा जपत साजरा करण्यात आला.ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या निमित्ताने सकाळपासूनच गावातील मुस्लिम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पारंपरिक पद्धतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर गावातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये मुस्लिम समाजातील नागरिकांसह लहान मुलांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विशेषतः लहान मुलांची उपस्थिती सर्वांचे लक्ष वेधून घेत

**मुस्लिम बांधवांचा शिस्तबद्ध सहभाग; ग्रामस्थांना मिठाई, खीर व खिचडीचे वाटप**

होती.मिरवणुकीत सहभागी झालेल्या मुस्लिम बांधवांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि शांततेत सहभाग नोंदविला. मिरवणुकीदरम्यान ग्रामस्थांना मिठाईचे वाटप करण्यात आले. त्यामुळे गावातील सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडले. कोणताही अनुचित प्रकार न घडता उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणूक पार पडली.मिरवणूक संपल्यानंतर फातेहा खानीचा धार्मिक कार्यक्रम पार पडला. यावेळी उपस्थित नागरिकांसाठी खीर आणि खिचडीचे वाटप करण्यात आले. या प्रसादाचा मोठ्या संख्येने नागरिकांनी लाभ घेतला. ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या निमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये गावातील मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

ईद-ए-मिलाद-उन-नबीच्या माध्यमातून समाजात प्रेम, शांतता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मेडशी येथे उत्साहात पार पडलेल्या या कार्यक्रमामुळे गावातील सामाजिक एकोपा अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. संपूर्ण कार्यक्रम शांततेत पार पडल्याने ग्रामस्थांकडूनही समाधान व्यक्त करण्यात आले.

---

### आकांक्षीत जिल्ह्याच्या विकासासाठी आयोगाची 'नीति'...

## पत्रकारांच्या चर्चेतून विकासाला गती!




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

निती आयोगाच्या वतीने आकांक्षीत जिल्ह्याच्या विकासासाठी पीआयबी मुंबईच्या अभ्यास दौऱ्यात वाशिम, गडचिरोली, नंदुरबार आणि धाराशिव जिल्ह्यातील पत्रकारांनी नीति आयोगाचे उपाध्यक्ष अशोक कुमार लाहिरी यांच्याशी चर्चा केली.

या बैठकीत वाशिम जिल्ह्यातील पत्रकारानी नीती आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की वाशिम जिल्हा हा गोदावरी आणि तापी नदी खोऱ्याच्या केंद्रभागी असल्याने या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाण्याच्या उपलब्धते साठी मोठी धरणे शक्य नाही त्यातून पाण्या अभावी मोठे उद्योग हि जिल्ह्यात येत नाहीत. त्या मुळे स्थानिक धार्मिक स्थळ जसे पोहरादेवी, शिरपूर जैन, तऱ्हाळा, कारंजा येथील दत्तावतार स्वामी नरसिंह मंदिर व वाशीम येथील बालाजी मंदिर आणि जिल्ह्यातील सोहळ अभयारण्य, काटेपुर्णा वन पर्यटन याची सांगड घालून रोजगार निर्मिती होऊ शकते. जिल्ह्यात कॅन्सरचे वाढते प्रमाण पाहता प्राथमिक स्तरावर कॅन्सर डिटेक्ट होण्यासाठी स्क्रिनिंग सेंटरची मागणी, शेतकरी व महिला बचत गटांच्या चिया उत्पादनांना बाजारपेठ, हळद प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन आणि शेती पुरक विविध उद्योगांसाठी सवलती या विषयांवर चर्चा झाली.यावेळी उमेदच्या महिला बचत गटांनी तयार केलेले चिया चॉकलेट, लाडू आणि हळद पावडर वाशिम जिल्ह्याच्या वतीने पत्रकार सुनील कांबळे, प्रमोद लक्रस आणि दत्ता महाले यांनी भेट म्हणून दिले. या वेळी पी आय बी मुंबईच्या उप संचालक जयदेवी पुजारी, श्रीयांका चटर्जी आणि विवेक विश्वास यांची उपस्थिती होती.राष्ट्रीय नीति आयोग कार्यालयात अडीच तास चाललेल्या या चर्चेत जिल्ह्याच्या विकासासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याचे संकेत मिळाले. नीती आयोगा मध्ये पत्रकारांच्या शिष्टमंडळाने नीती आयोगाचे उपाध्यक्ष आर्णि अ्ड्ढ/ड्ढ टीममधील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यामध्ये या प्रमुख कार्यक्रमांची अंमलबजावणीची चौकट, देखरेख यंत्रणा आणि विकासात्मक परिणाम यांबाबत संवाद साधण्यात आला. निती आयोगाने आकांक्षिंत जिल्ह्यातील विकासाची वाटचाल असलेल्या विविध पैलूंची मिमांसा केली.पत्रकारांनी 'विकसित भारत स्ट्रॅटेजी रूम'लाही भेट दिली आणि ADP/ABP डॅशबोड्र्सची पाहणी केली. डेटा व्हिज्युअलायझेशन (माहितीचे दृश्य स्वरूप) आणि रिअल-टाइम पुरावे (तात्काळ उपलब्ध माहिती) यांच्या आधारे तळागाळात माहिती-आधारित निर्णयक्षमता आणि परिणाम-केंद्रित प्रशासन कसे शक्य होत आहे, याची माहिती दिली.

---

# सरकार की आमद मरहबाच्या घोषणांनी दुमदुमले शहर!

## जश्न-ए-ईद मिलादुन्नबी निमित्त निघाली भव्य मिरवणूक

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम शहरात जश्न-ए-ईद मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आली.ईद निमित्ताने शहरातील नगीना मस्जिद परिसरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांसह लहान मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला.







वाशिम मध्ये जशने ईद मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या ईद निमित्त शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये सहभागी झालेल्या मुस्लिम बांधवांनी आणि लहान मुलांनी पांढरे शुभ्र कपडे परिधान केले . हातात झेंडे, बॅनर घेऊन तसेच अत्तर लावून त्यांनी मिरवणुकीची शोभा वाढवली. यावेळी डीजे, घोडे आणि आकर्षक बग्गीचाही समावेश करण्यात आला .या मिरवणुकीची सुरुवात नगीना मस्जिद येथून करण्यात आली.

त्यानंतर शिवाजी महाराज चौक, पाटणी चौक, काटीवेश, जुनी नगरपालिका, दंडे चौक, बागवानपुरा आणि राजनी चौक मार्गे मिरवणूक काढण्यात आली. शेवटी नबी साहेब मस्जिद येथे नमाज अदा करून मिरवणुकीचा समारोप करण्यात आला.

दरम्यान, 'सरकार की आमद मरहबा'च्या घोषणांनी संपूर्ण वाशिम शहर दुमदुमून गेले होते. शहरातील नागरिकांनीही या मिरवणुकीचे विविध ठिकाणी स्वागत करत जश्न-ए-ईद मिलादुन्नबीचा आनंद साजरा केला. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांनी तसेच लहान मुलांनी मिरवणुकीत सहभाग नोंदविला.

---

# रिसोड येथे जमात-ए-इस्लामी हिंद युथ मुव्हमेंटच्या रक्तदान शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त जमात-ए-इस्लामी हिंद युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्राच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रिसोड शहरातील चांदणी चौक परिसरातील गुलशन-ए-आशिया इंग्लिश स्कूलमध्ये २६ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल ९६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.या रक्तदान शिबिरात ६ महिलांनीही उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. महिलांचा सहभाग हे यंदाच्या शिबिराचे विशेष आकर्षण ठरले असून उपस्थितांमध्ये त्याची चर्चा झाली.

सामाजिक बांधिलकी जपत महिलांनी रक्तदानासाठी पुढाकार घेतल्याचे यावेळी दिसून आले.रक्तदान शिबिराला रिसोडचे





नगराध्यक्ष भगवानदादा क्षीरसागर, रिसोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण, तसेच मराठा सेवा संघाचे पदाधिकारी व सदस्य यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले.

रक्तदात्यांची नोंदणी, मार्गदर्शन, व्यवस्था आणि शिबिराचे नियोजन यासाठी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतल्याने शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.रक्तदान हे जीवनदान या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद सामाजिक एकतेचे आणि सेवाभावाचे उदाहरण ठरला. ९६ रक्तदात्यांनी केलेले रक्तदान आणि त्यामध्ये सहभागी झालेल्या ६ महिलांचा सहभाग यामुळे यंदाचे शिबिर विशेष ठरले.

रक्तदान शिबिराला भेट देण्यात साठी आलेल्या मान्यवरांचे जमात ऐ इस्लामी हिंद च्या वतीने पुष्पगुच्छ व प्रेषित महंमद पैगंबर यांच्या जीवन विषयावर आधारित पुस्तक देऊन सन्मान सत्कार करण्यात आले. सदर शिबिरासाठी सौ कांता देवी डाळे रक्तपेढी वाशिम यांच्याकडून डॉ दिगंबर निरगुडे पाटील, गणेश चंद्रशेखर,जीवन वानखेडे, गणेश गडकर, अक्षय पिंपळे,अभिजीत जावळे यांनी रक्त संकलन केले.

# खामगाव तालुक्यातील नागापूर येथे दिव्यांग जागृती शिबिर व समस्या निराकरण अभियान संपन्न



प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**खामगाव :** खामगाव तालुक्यातील मौजे नागापूर येथे दिव्यांग बांधवांच्या जनजागृतीसाठी विशेष दिव्यांग जागृती शिबिर व गावातील समस्या निराकरण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विराट मल्टीपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष मनोज नगरनाईक, दिव्यांग फाउंडेशन बुलढाणा जिल्हाध्यक्षा कविता इंगळे, समाजसेवक व टायगर ग्रुपचे उप जिल्हाध्यक्ष पीयुष चव्हाण व जगमित सिंह* हे उपस्थित होते.

यावेळी मनोज नगरनाईक यांनी दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध योजनांबाबत सविस्तर माहिती दिली. यूडीआयडी (छ्ढ्ष्ठ) कार्ड, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, एस.टी. सवलत पास, ई-श्रम कार्ड, तसेच दिव्यांग साधन वाटप योजना या योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दिव्यांग कायदा २०१६ ची माहितीसह अनेक दिव्यांगांचे कल्याणकारी योजना अर्ज जागेवरच समजावून सांगित अर्ज सादर करीत योजना कश्या मिळाव्यात यासाठी जिल्हा अध्यक्ष कविताताई इंगळे यांनी मार्गदर्शन केले तसेच गावातील पाणी, रस्ते, घरकुल, स्वच्छता व इतर मूलभूत समस्यांबाबत ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या तक्रारी जाणून घेण्यात आल्या व संबंधित विभागाकडे तात्काळ पाठपुरावा करण्याचे आश्वासन समाजसेवक पीयुष चव्हाण दिले .या अभियानामुळे शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.व गावातील समस्या निराकरण करण्यासाठी आम्ही सदस्य प्रयत्न करू असे आश्वासन राजू भाऊ पवार व साजण राठोड यांनी दिले कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य सह ग्रामस्थ व मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते.कार्यक्रमासाठी पूनमताई चव्हाण,सचिन सोळंके मयूर सोळंके यांनी परिश्रम घेतले

# पिकांसाठी खतांचा संतुलीत वापर करणे गरजेचे

## कृभको सहकारी संस्थेतर्फे आयोजित विक्रेता परिषदेत विचार मंथन

प्रतिनिधी २७ ऑगस्ट



**मलकापूर :** कृभको सहकारी संस्थेतर्फे विक्रेता परिषद मलकापूर येथे आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शशिकांत सर व्यवस्थापक (स्त्रस्) नोएडा होते. तर उद्‌घाटक आणि मार्गदर्शक म्हणून कृभकोचे राज्य विपणन व्यवस्थापक जे टी भामरे, आरजी बी तुषार कोचर, प्रमुख पाहुणे म्हणून शंकरराव शेंडगे विभागीय व्यवस्थापक नागपूर, संदीप जाधव जिल्हा कार्यकारी अध्यक्ष विदर्भ को ऑप मार्केटिंग फेडरेशन जिल्हा प्रबंधक होनाळे होते.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक शंकरराव शेंडगे, विभागीय व्यवस्थापक नागपूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना काळानुसार रासायनिक खताचा पिकांच्या वेगवेगळ्या वाढीनुसार संतुलित वापर तसेच कृभकोच्या वतीने माती तपासणी करून घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर राज्य विपणन व्यवस्थापक जे. टी. भामरे यांनी खरीप हंगामातील घेण्यात येणाऱ्या पिकावर आणि खतांचा संतुलित वापर यावर सविस्तर चर्चा केली. तसेच जैविक खते व सेंद्रिय कंपोस्ट यांच्या वापरापासून होणारे फायदे व जमिनीचे आरोग्य तसेच जमिनीमधील सेंद्रिय कर्बाच्या वाढीमुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते, यावर उपस्थित विक्रेत्यांना मार्गदर्शन केले. पीक नियोजन पद्धती आणि जैविक खताचा वापर करण्याचे आवाहन केले. नवीन खत प्रणाली बद्दल मार्गदर्शन केले. आणि जिल्ह्यात प्राप्त झालेल्या खताचा आढावा घेतला. त्यानंतर शशिकांत सर विकास व्यवस्थापक यांनी नोएडामध्ये होणाऱ्या माती परीक्षणबद्दल आणि वेगवेगळ्या जैविक खताविषयी माहिती दिली. कार्यक्रमाला घाऊक व किरकोळ विक्रेते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अभिषेक अंबाडकर यांनी केले.

# इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी विनोद भोकरे

प्रतिनिधी २७ ऑगस्ट



**बुलढाणा :** पत्रकारितेच्या च्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासोबतच सर्वसामान्यांच्या समस्या शासन-प्रशासनापर्यंत पोहोचविण्यासाठी सदैव कार्यरत असलेल्या इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्षपदी खामगाव येथील पत्रकार तथा संपादक विनोद भोकरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष सिराज अहमद कुरेशी यांच्या आदेशानुसार प्रदेशाध्यक्ष सैय्यद जाकीर हुसैन यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही घोषणा केली. इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या माध्यमातून न पत्रकारांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्याबरोबरच वंचित, गरजू आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्याचे काम केले जाते. पत्रकारांनी निर्भीडपणे आपली भूमिका मांडावी, यासाठी संघटना सातत्याने पत्रकारांच्या पाठीशी उभी राहत असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. नवनियुक्त प्रदेश कार्याध्यक्ष विनोद भोकरे यांनी नियुक्तीबद्दल राष्ट्रीय अध्यक्ष सिराज अहमद कुरेशी व प्रदेशाध्यक्ष सैय्यद जाकीर हुसैन यांचे आभार मानले. पत्रकारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता सत्य आणि जनहिताच्या बाजूने ठामपणे उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले. स्वतंत्र, निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारिता ही लोकशाहीची मजबूत आधारशिला आहे. पत्रकारांनी सत्याच्या बाजूने उभे राहून समाजातील ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली पाहिजे. पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन यापुढेही खंबीरपणे पाठीशी उभी राहणार असल्याचे विश्वास विनोद भोकरे यांनी व्यक्त केला.

# साखरखेर्डा येथे कुस्त्यांची दंगल

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**साखरखेर्डा :** दरवर्षीप्रमाणे सिंदखेड राजा तालुक्यातील साखरखेर्डा येथे राजपूत समाज बांधवांच्या वतीने रक्षाबंधनाच्या सणाला भव्य कुस्त्यांचे आयोजन करण्यात येत असते याहीवर्षी २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन सणाला कुस्त्यांची दंगल आयोजित करण्यात आली असून 'जवळपास तीन लाख रुपयांचे बक्षिसे ठेवण्यात आली आहे' या परिसरातील बक्षिसांमध्ये नागरिकांनी आपापल्या परीने बक्षीस दिले असून यामध्ये २१,०००, १५०००, ११०००, ७५०१, ७५०० , ७१००, ७०००, ५५००, ५१०० ५१००, ५१०० अशी बक्षीसे राहणार आहे. बक्षीसांमधून उपविजेत्यास ८०/२० प्रमाणे बक्षीसे देण्यात येईल.

# शिर्ला नेमाने येथील श्री गुप्तेश्वर विद्यालयात विद्यार्थ्यांनी गिरवले रस्ता सुरक्षेचे धडे

प्रतिनिधी २७ ऑगस्ट



**खामगाव :** वाढते रस्ते अपघात कमी करण्यासाठी २४ ऑगस्ट रोजी खामगाव तालुक्यातील शिरला नेमाने येथील श्री गुप्तेश्वर विद्यालय येथे खामगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रादेशिक परिवहन अधिकारी रविंद्र भुयार भुयार तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी युवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाची संकल्पना सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी मोहम्मद समीर मोहम्मद याकूब सर यांनी मांडली. कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा विषयक वाढविण्यासाठी 'रोड रेस' या जागरूकता खेळाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून रस्ता सुरक्षेचे महत्त्व आत्मसात केले. स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला विशेष बक्षीस देऊन गौरविण्यात आले. याचबरोबर 'रोड सेफ्टी व्हिजन व्हॅन'च्या माध्यमातून विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच उपस्थित नागरिकांना अपघाताची कारणे आणि अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत स्क्रीनवर प्रत्यक्ष चित्रीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. या माध्यमातून प्रभावी जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात मोटार वाहन निरीक्षक मनोज शेळके, वाहन चालक हेमंत सोनटक्के व नारायण देशमुख आदींनी सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र चोथवे, काटोलकर, श्रीमती निंबाळकर मॅडम, विटे सर, दळवे सर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र चोथवे यांनी परिवहन विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या रस्ता सुरक्षा जनजागृती उपक्रमांचे कौतुक करून आभार व्यक्त केले.

# नेपाळ महाप्रलय; जिल्हा प्रशासनाची यंत्रणा सज्ज!

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**बुलढाणा :** नेपाळमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर बुलढाणा जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. जिल्हा प्रशासन राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या संपर्कात असून, जिल्ह्यातील पर्यटक नेपाळमध्ये अडकले असल्याची कोणतीही माहिती अद्याप प्राप्त झालेली नाही. जिल्ह्यातील नागरिक किंवा पर्यटक नेपाळला गेले आहेत का, याबाबत माहिती संकलित केली जात आहे. जिल्ह्यातील कोणतीही व्यक्ती नेपाळमध्ये अडकली असल्यास तिच्याबाबत तातडीने माहिती अलर्ट उपलब्ध व्हावी, यासाठी प्रशासनाकडून यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने सर्व तहसीलदारांना राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडूनही परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून, तेथून प्राप्त होणाऱ्या माहितीनुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे. नेपाळमध्ये गेलेल्या जिल्ह्यातील पर्यटक किंवा नागरिकांबाबत माहिती मिळाल्यास प्रशासनाला तातडीने कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सध्या जिल्ह्यातील कोणताही पर्यटक नेपाळमध्ये अडकल्याची अधिकृत माहिती प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. जिल्ह्यातील कोणतेही नागरिक किंवा पर्यटक नेपाळमध्ये अडकले असतील, तर त्यांच्या नागरिकांनी कुटुंबातील http:// geosptial.mahaseoc.in/sa hayata_ gulf/ या लिंकवर जाऊन त्यांची सविस्तर माहिती भरावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे.

# काटी येथील तीन घरे फोडून, एकाच्या खून प्रकरणी दोघा आरोपींना अटक, सहा दिवसाची पोलीस कोठडी

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**मलकापुर :** नांदुरा तालुक्यातील काटी गावात ९ ऑगस्ट रोजी घडलेल्या घरफोडी व चोरी प्रकरणात दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्यात ५२ वर्षीय इसमाचा निर्घृण खून झाला होता. याप्रकरणी तब्बल १७ दिवसांनी पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून या प्रकरणातील २ आरोपींना अटक करून त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबतची माहिती अशी की, येथून जवळच असलेल्या व नांदुरा तालुक्यातील मौजे काटी येथे ९ ऑगस्ट रोजी गावात अज्ञात चोरट्यांनी चोरी व घरफोडी केली होती. मात्र चोरटे गावात आल्याचे गावातीलच रायसिंग सिताराम सोळंकी (वय ५२) यांनी चोरट्यांना हटकले व त्यांचा पाठलाग केला असता अज्ञात चार चोरट्यांनी त्यांच्यावर हल्ला करत चाकूने वार करून खून होता. त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला होता. या घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी सोहम माछरे यांच्याकडे देण्यात आला होता. तर या प्रकरणी चार अज्ञात आरोपींविरूध्द निलेश शिवराम सोळंके (वय ३०) रा.काटी ता.नांदुरा याने दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनला अप.क्र.१६३/२०२६ कलम १०३ (१), ३३१ (८), ३(५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तब्बल १७ दिवसांच्या तपासानंतर पोलिसांनी संतोष शिवबासअप्पा पवार (वय २५ वर्षे) रा. लालगोटा मदापुरी ता.मुक्ताइनगर जि.जळगांव खा व दिनेश तुकाराम चव्हाण (वय २५ वर्षे) रा.डेबुजी नगर, राहटगांव जि.अमरावती ह.मु.पुर्णाळ फाटा ता. मुक्ताइनगर जि.जळगांव खा. या दोन आरोपींना २५ ऑगस्ट रोजी अटक केली. यानंतर आज २६ ऑगस्ट रोजी आरोपींना मलकापूर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ३१ ऑगस्ट पर्यंत म्हणजेच ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सोहम माछरे यांनी दिली.

# हरित अंत्रज ! स्वामी विवेकानंद महाविद्यालयात 600 वृक्षांची लागवड

## प्राचार्य डॉ. संजय आराख यांचा पुढाकार

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**खामगाव :** येथून जवळच असलेल्या स्वामी विवेकानंद महाविद्यालय, अंत्रज येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय आराखआणि प्रा. कडुबा पैठणे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या झाडांचे रोपण करण्यात आले. यामध्ये पर्यावरणपूरक आणि औषधी गुणधर्म असलेल्या पिंपळ, वड, बदाम, पाम, कडुलिंब, आंबा, पेरू, जांभूळ, साग अशा विविध प्रजातींच्या झाडांचा समावेश होता. यावेळी जवळपास ६०० झाडे लावण्यात आली. या उपक्रमामुळे महाविद्यालय परिसर हिरवागार होण्यास मदत होणार असून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक ऋषिकेश आराख,अनिकेत आराख ,मिलिंद पानपाटील , रेवती ठाकरे,बाबुराव वानखेडे , रत्नमाला वाघ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रा. कडुबा पैठणे यांनी केले वृक्षरोपण**

केवळ झाडे लावून न थांबता, त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी महाविद्यालयाने घेतली असून, यापुढे अजून एक हजार झाडे लावण्याचा संकल्प यावेळी प्राचार्य डॉ. संजय आराख,प्रा.कडुबा पैठणे यांनी व्यक्त केला. अंत्रज महाविद्यालय ठरणार ऑक्सिजन पार्क! महिनाभरात ६०० झाडे लावून पर्यावरणाचा संदेश यावेळी देण्यात आला.

# दुधलगाव शिवारातील बलात्कार प्रकरणी 2 आरोपींना अटक; 3 दिवसांची पोलीस कोठडी

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**मलकापुर :** महिनाभरापूर्वी मलकापूर तालुक्यातील दुधलगाव येथील शेतात दि.१७ जुलै २६ रोजी रात्री अकरा वाजे दरम्यान दोघा अनोळखी युवकांनी तोंडाला रुमाल बांधून शेतातील राहत्या घरात घुसून चाकू व विळ्याचा धाक दाखवून फिर्यादी च्या पती कडून नगदी ६००/- रुपये व रेड मी कंपनी चा मोबाईल जबरीने हिसकावून घेतला व फिर्यादी १९ वर्षीय विवाहितेला घरासमोरील शेतामध्ये ओढत घेऊन जावून आळीपाळीने बलात्कार करुन घटनास्थळावरून पोबारा केला होता.या घटनेची फिर्याद पिडीतेने दि.१८ जुलै २६ रोजी मलकापूर ग्रामीण पोलिसांना दिली होती. नमूद दोन्ही आरोपी या आदिवासी भाषा बोलत होते अशा फिर्यादी वरून अपराध क्रमांक १४८ / २६ कलम ६४( १),७०(१), ३०९ (४),३११, ३३३, ३५१, (२ )(३),३( ५) बि.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप खामगाव, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहन माछरे मलकापूर यांचे मार्गदर्शनाखाली पो.स्टे मलकापूर ग्रामीणचे ठाणेदार सतीश महल्ले यांनी तपास सुरू केला. गुन्ह्याचे तपासामध्ये फॉरेन्सिक टीमच्या समक्ष पंचनामा करण्यात आला. डॉगस्कॉट, फिंगर प्रिंट युनिट यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले. सदर गुन्ह्याचे तपासामध्ये वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, सायबर शाखा बुलढाणा यांचे वेगवेगळे तपास पथक तयार करून गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यात आला.

घटनास्थळावरून जाणाऱ्या सर्व रस्त्यावरचे सी.सी.टी.व्ही फुटेज तसेच दम दाटा काढून त्यांचे विश्लेषण करण्यात आले. पोस्ट हद्दीतील तसेच लगतच्या गावातील आदिवासी /पावरी समाजाच्या लोकांकडे गुन्ह्याचा तपास करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा येथील पोलीस उपनिरीक्षक अविनाश जायभाये व त्यांचे पथकातील इतर कर्मचारी यांनी गुन्ह्याचे समांतर तासांमध्ये गुन्ह्यात जबरीने चोरीला गेलेला मोबाईल तांत्रिक विश्लेषण व मिळालेला गोपीनीय माहितीच्या आधारे राकेश महेंद्रसिंग भिलाला वय २२,जामसिंग रोशन भिलाला वय २२ वर्षे दोन्ही रा. जामठी ता. जिल्हा बऱ्हाणपूर यांना ताब्यात दोघांना पुढील चौकशीकामी पो.स्टे मलकापूर ग्रामीण येथे हजर केले असता नमूद आरोपींची पो.नि सतीश महल्ले यांनी कसून चौकशी केली असता त्यांनीच हा गुन्हा केला असल्याची कबुली दिली तसेच त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरीला गेलेला फिर्यादीचा मोबाईल ही जप्त करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण तसेच परिस्थितीजन्य पुरावे याचे आधारावर आरोपीतांना अटक करून आज मलकापूर न्यायालयात हजर केले असता दोन्ही आरोपींना दि.२९ ऑगस्ट २६ पावेतो पोलीस कोठडी मिळाली आहे. पुढील तपास जिल्हा पोलीस निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहम माछरे यांच्या मार्गदर्शनाखाली मलकापूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक सतीश महल्ले, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत राठोड,पो. हे.कॉ सचिन दासर, पो.हे कॉ रघुनाथ जाधव, पो.कॉ.संदीप राखोंडे करीत आहे.

# खामगाव सामान्य रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन महिनाभरापासून बंद; रुग्णांची गैरसोय

प्रतिनिधी २७ ऑगस्ट

**खामगाव :** सामान्य रुग्णालयातील सीटी स्कॅन मशीन नादुरुस्त झाल्याने २८ जुलैपासून सीटी स्कॅन सेंटर बंद आहे. महिनाभरापासून जवळपास महत्त्वाची तपासणी सेवा बंद असल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे. सीटी तपासणीसाठी स्कॅन ही रुग्णांना खासगी केंद्रांचा आधार घ्यावा लागत असून, त्यासाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहेत. त्यामुळे उपचाराचा खर्च आधीच पेलणाऱ्या रुग्णांवर आर्थिक भार वाढला आहे.

खामगाव सामान्य रुग्णालयात एका कंपनीच्या माध्यमातून सीटी स्कॅन सेंटर सुरू करण्यात आले आहे. रुग्णालयातउपचारासाठी दाखल होणाऱ्या रुग्णांची सीटी स्कॅन तपासणी येथे मोफत केली जाते. तसेच खासगी रुग्णालयांतून संदर्भित होऊन येणाऱ्या रुग्णांची तपासणीही नाममात्र शुल्कात केली जाते. त्यामुळे खामगावसह परिसरातील गरीब व गरजू रुग्णांसाठी हे सेंटर महत्त्वाचे ठरत आहे; मात्र मशीन नादुरुस्त झाल्याने सेंटर बंद ठेवण्यात आले आहे. रुग्णालयात उपचार घेत असताना डॉक्टरांनी सीटी स्कॅन तपासणीचा सल्ला दिल्यास रुग्णांना आता बाहेरील खासगी केंद्रात जावे लागत आहे. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे.

**तब्बल नऊ महिने बंद होते सेंटर**

खामगाव सामान्य रुग्णालयातील सीटी स्कॅन सेंटरमधील मशीनमध्ये पाणी गेल्याने मागील वर्षी तब्बल नऊ महिने हे सेंटर बंद होते. मशीनच्या दुरुस्तीकडे वेळेत लक्ष न दिल्याने सीटी स्कॅन सेवा दीर्घकाळ ठप्प राहिली होती. आता पुन्हा मशीन नादुरुस्त झाल्याने सेंटर बंद आहे. यापुढे अशी परिस्थिती उद्भवू नये, यासाठी रुग्णालय प्रशासनाने मशीनची तातडीने दुरुस्तीची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**'मशीन दुरुस्त करून सेंटर सुरू करा!'**

सीटी स्कॅन मशीन नादुरुस्त असल्याने सेंटर बंद आहे. त्यामुळे रुग्णांना आवश्यक तपासणीसाठी खासगी केंद्रांचा आधार घ्यावा लागत असून, त्याचा अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. रुग्णांची गैरसोय लक्षात घेता सीटी स्कॅन मशीनची तातडीने दुरुस्ती करून सेंटर पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांकडून होत आहे.

**सीटी स्कॅनसाठी खासगी केंद्रात जाण्याची वेळ**

ग्रामीण भागातून उपचारासाठी येणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना सीटी स्कॅन सेंटर बंद असल्याचा मोठा फटका बसत आहे. तपासणीसाठी खासगी केंद्रात शुल्क भरावे लागत असून, ये-जा खर्चाचाही अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे. संबंधित यंत्रणेने याची तातडीने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
८
गुरूवार, दि.२७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# विनापरवानगी भंडाऱ्यांवर थेट कारवाई

## एफडीए ॲक्शन मोडवर; पालखी, गणपती, देवीच्या भंडाऱ्याला लागेल परवानगी

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**अकोला:** सध्या पवित्र श्रावण महिना सुरू आहे. श्रावण महिन्यात पालखी आणि त्यानंतर गणपती व देवी बसल्यावर परिसरातील मंदिरे, सार्वजनिक मंडळे तसेच विविध ठिकठिकाणी भाविकांकडून महाप्रसाद आणि मोफत अन्नदानाच्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र, अस्वच्छता आणि निष्काळजीपणामुळे अन्नातून विषबाधेसारखे गंभीर प्रकार घडू नयेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन (एफडीए) पूर्णपणे ॲक्शन मोडवर आले आहे.

भाविकांच्या आरोग्याची सुरक्षा विचारात घेता, आता कोणत्याही सार्वजनिक महाप्रसादाचे आयोजन करण्यासाठी एफडीएचा अधिकृत परवाना किंवा नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. परवान्याशिवाय महाप्रसाद वाटप करताना आढळल्यास संबंधित आयोजकांवर थेट गुन्हे दाखल करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.



### महाप्रसादासाठी काढावा लागेल 100 रुपयाचा ऑनलाईन परवाना

» महाप्रसाद करणाऱ्या आयोजकांची सोय व्हावी यासाठी एफडीएने नोंदणी प्रक्रिया अत्यंत सुलभ केली आहे. आयोजकांना अन्न सुरक्षा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर अवघ्या १०० रुपयांत ऑनलाइन नोंद किंवा परवाना प्राप्त करता येईल.

### पाळाव्या लागतील या अटी

» महाप्रसादाच्या तयारीदरम्यान स्वच्छता राखण्यासाठी आणि अन्नाचा दर्जा उत्तम ठेवण्यासाठी एफडीएने काही अटी पाळण्याचे बंधनकारक केले आहे. महाप्रसादाचा स्वयंपाक बनवण्यासाठी तसेच 3 पिण्यासाठी केवळ स्वच्छ किंवा आरओ पाण्याचाच वापर करावा. अन्न बनवणाऱ्या आणि भाविकांना प्रसाद वाढणाऱ्या सर्व स्वयंसेवकांनी मास्क, हातमोजे आणि डोक्यावरील टोपी घालणे बंधनकारक आहे. तसेच तयार केलेला प्रसाद जास्त वेळ उघड्यावर ठेवता येणार नाही. तसेच शिळे अन्न भाविकांना वाटप केल्यास आयोजकांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. महाप्रसादाचे अन्न साठवण्यासाठी आणि वाटपासाठी केवळ स्टेनलेस स्टील किंवा अन्न सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षित असलेल्या भांड्यांचाच वापर करावा लागेल भाविकांच्या विश्वासाला आणि आरोग्याला तडा जाऊ नये म्हणून अन्न व औषध विभागाने हा निर्णय घेतला आहे आयोजकांनी निर्णयाचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे विनापरवाना महाप्रसादाचे आयोजन केल्यास कारवाई होईल अशी माहिती अन्न व औषध विभागातर्फे जारी करण्यात आली आहे.

# राज्यातील आरोग्य यंत्रणेचे धिंडवडे निघालेत

## विजय वडेट्टीवार यांचा सरकारवर घणाघात



प्रतिनिधी २७ऑगस्ट

**अमरावती :** महाराष्ट्रातील आरोग्य यंत्रणेच्या दुरावस्थेवरून विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. आरोग्य यंत्रणेचे पूर्णपणे धिंडवडे निघाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. रुग्णालयांमध्ये लहान मुलांच्या सुरक्षिततेबाबत मोठा गोंधळ असून सरकार केवळ चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. या सर्व प्रकरणाचा चौकशी अहवाल ८ दिवसांच्या आत जाहीर करून दोषींवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक मागणी वडेट्टीवार यांनी केली.

"आज ही सरकारी हॉस्पिटल्स कोणाच्या अखत्यारित चालतात? आरोग्य मंत्र्यांच्या! मग या प्रकरणात दोषी मंत्री असताना त्यांच्यावर गुन्हा दाखल का होत नाही. सरकार आरोग्य व्यवस्थेबाबत अजिबात गंभीर नाही. सरकारला जनतेच्या जिवाची पर्वा नसून फक्त इव्हेंट्सवर पैसा खर्च करण्यात रस आहे. ८ दिवसांत अहवाल द्या चौकशीच्या नावाखाली टोलवाटोलवी चालणार नाही. येत्या ८ दिवसांच्या आत या प्रकरणाचा सविस्तर चौकशी अहवाल समोर आलाच पाहिजे आणि जबाबदार व्यक्तींवर कडक कारवाई झाली पाहिजे असेही ते म्हणाले. पत्रपरिषदेला माजी मंत्री सुनील देशमुख, माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. यावेळी विरोधी पक्ष नेते विजय वडट्टीवार यांनी जिल्हा स्त्री रुग्णालयाची सुद्धा पाहणी केली.

# जमाअत-ए-इस्लामी हिंद शाखेतर्फे वृद्धाश्रमात शिबीरासह अन्नदान

प्रतिनिधी २७ऑगस्ट

अकोला: जमाअत-ए-इस्लामी हिंद, पश्चिम झोन अकोलातर्फे आज वृद्धाश्रमात एका महत्त्वपूर्ण मानवसेवा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी तेथे राहणाऱ्या सुमारे ४० ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी शिबीर आणि दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आली.

वैद्यकीय शिबीरादरम्यान ज्येष्ठ नागरिकांच्या रक्तातील साखरेची आणि रक्तदाबाची तपासणी करण्यात आली. यासोबतच इतर आवश्यक आरोग्य तपासण्या आणि वैद्यकीय सल्लाही देण्यात आला.



या वैद्यकीय शिबीरात डॉ. हुजैफा खान आणि डॉ. मोहम्मद आसिम यांनी आपल्या सेवा दिल्या.

आरोग्य तपासणीनंतर सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष भोजनाचे आयोजन करण्यात आले. जेवणात मिक्स भाजी, भात, पोळी आणि मिठाई वाढण्यात आली. जमाअतच्या कार्यकर्त्यांनी वृद्धांसोबत वेळ घालवला, त्यांची आपुलकीने चौकशी केली आणि त्यांच्या गरजा व समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

या प्रसंगी वृद्धाश्रमातील परिस्थिती पाहून इस्लाम आणि पैगंबर मोहम्मद यांच्या त्या महान संदेशाची अधिक तीव्रतेने जाणीव झाली, ज्यामध्ये आई-वडील आणि वृद्धांचा सन्मान व सेवेला अत्यंत उच्च स्थान देण्यात आले आहे. पवित्र कुरआनमध्ये ईश्वराने (अल्लाह) आपल्या उपासनेसोबतच आई-वडिलांशी उत्तम व्यवहार करण्यावर विशेष भर दिला आहे.

हे वृद्धाश्रम माजी मंत्री गुलाबराव गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व देखरेखीत चालवले जात आहे.

जमाअत-ए-इस्लामी हिंद अकोलाचा हा उपक्रम केवळ वैद्यकीय शिबीर आणि अन्नदानापुरता मर्यादित नव्हता, तर समाजासाठी हा एक स्पष्ट संदेश होता की वृद्धांची सेवा, त्यांचा सन्मान आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आई-वडील आणि ज्येष्ठ नागरिकांबद्दल प्रेम, आदर आणि सद्वर्तन हीच एका सभ्य आणि दयाळू समाजाची ओळख आहे.

"सक्रिय कार्यकर्ते – सक्रिय जमाअत" अभियानांतर्गत आयोजित या कार्यक्रमात सुमारे १६ कार्यकर्त्यांनी मोलाची भूमिका बजावली. या प्रसंगी पश्चिम झोनचे सदस्य, शहराध्यक्ष डॉ. अहमद उरूज तसेच उत्तर झोनचे सदस्यही उपस्थित होते.

# बेघर निवारा' येथे लिनेस क्लब ऑफ अकोलातर्फे नेत्र तपासणी शिबिर संपन्न

## 10 गरजूंच्या मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा संकल्प

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**अकोला:** २६ ऑगस्ट रोजी 'बेघर निवारा' येथे लिनेस क्लब ऑफ अकोला संस्थेतर्फे एक अत्यंत संवेदनशील व यशस्वी नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला डॉ. पुरुषोत्तम समनपुरे यांचे विशेष सहकार्य लाभले. हे शिबिर एक टीमवर्क होते. या टीममध्ये टेक्निशियन मनाली जोगदंड, शिबिर प्रमुख अजय देशमुख आणि डॉक्टर सौरभ इंगोले प्रमुख होते.



ही टीम दमानी नेत्रालयातून आली होती. या केंद्राच्या संचालिका श्रीमती उषा राऊत यांनी आपल्या मनातील वेदना व्यक्त करताना सांगितले की, _"इथे नेत्र तपासणी शिबिर घ्यायला तर अनेकजण येतात, पण या बेसहारा वृद्धांसाठी दृष्टीचे वरदान ठरणारे म्हणजे त्यांचे ऑपरेशन करून देणारे कोणीही पुढे येत नाही."_ ही करूण बाब थेट अंतःकरणाला भिडली. त्याच क्षणी मनात सेवेची ज्योत पेटली आणि असा दृढ संकल्प करण्यात आला की, या शिबिरात जितकेही वृद्ध मोतीबिंदू किंवा डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी चिन्हांकित होतील, त्या सर्वांवर संपूर्ण उपचार व शस्त्रक्रिया करून देण्यात येईल.

# शिवसृष्टी निर्माण कार्यात राजकारण बाजूला ठेवून निधीचा सदुपयोग करा, सीओंना निवेदन

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**तेल्हारा:** तेल्हारा तेल्हारा शहरात नियोजित शिवसृष्टी निर्माण कार्य करतांना राजकारण बाजूला ठेवून, उपलब्ध निधीचा सदुपयोग करा व मंजूर आराखड्यानुसार भव्य दिव्य शिवसृष्टी व छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारणीचे कार्य तात्काळ पूर्ण करावे. अशी मागणी एका निवेदनातून मोचीपुरा भागातील नागरिकांनी सोमवारी दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी केली आहे. तेल्हारा शहरातील मोचीपुरा भागातील रहिवाशी दीपा महेश सिसोदिया यांनी सोमवारी छत्रपती शिवाजी महाराज शिवसृष्टी व पुतळा उभारणीचे काम मंजूर अंदाजपत्रक व मंजूर आराखड्यानुसार तात्काळ पूर्ण करण्याबाबतच्या विषया अंतर्गत सोमवार दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी निवेदन सादर केले असून सदर काम करताना कोणत्याही राजकीय व्यक्ती, लोकप्रतिनिधीच्या दबावाला बळी न पडता मंजूर अंदाजपत्रक टेक्निकल शांक्शन, प्रशासकीय मान्यता, मंजूर लाईन प्लॅन व उपलब्ध निधी यांचा सदुपयोग करून शासकीय नियमानुसार काम पूर्ण करण्याची जबाबदारी मुख्याधिकारी यांनी पार पाडावी. असा सल्ला निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर अर्जदार दीपा सिसोदिया यांच्यासह महेश सिसोदिया, विनोद धारपवार, राम पदवाड, सुरेखा प्रेमचंद सुंदरलाल बायड, देवीचंद बायड, सुरज पवार, अतुल कोरडे, आकाश पवार, सुनील गोयल, मीरा पीडीआर अंगद शिसोदिया, मंगेश घोंगे इत्यादींच्या सह्या आहेत.



# महिलांनी खोट्या अफवांना व भूलथापांना बळी पडू नये !

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**अकोला :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांची आर्थिक फसवणूक करण्याच्या उद्देशाने विविध प्रकारच्या खोट्या अफवा व दिशाभूल करणारी माहिती पसरविली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. काही व्यक्तींकडून लाभार्थी महिलांना ज्या महिलांचे योजनेचे पैसे बंद झाले आहेत, त्यांनी महा-आयडी कार्ड काढल्यास पैसे पुन्हा सुरू होतात, केवायसी पूर्ण होते, अन्यथा लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद होईल, आपले सरकार पोर्टलवर तक्रार दाखल केल्यास लाभ तात्काळ सुरू होतो, अशा स्वरूपाची दिशाभूल करणारी माहिती दिली जात आहे.

# पातूर-वाशिम महामार्गावर भीषण अपघात; एक ठार, चार जखमी

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**पातूर :** पातूर-वाशिम महामार्गावरील बोडखा गावाजवळील राजस्थानी धाब्याच्या परिसरात रात्रीच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एक जण ठार तर चार जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्रवासी वाहनातून प्रवास करीत होते. हे प्रवासी अजमेरकडे जात असल्याची प्राथमिक माहिती असून अपघातात जखमी झालेल्या चौघांना उपचारासाठी अकोला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नसून संबंधित यंत्रणेकडून अधिक माहिती घेतली जात आहे. दरम्यान, अपघातग्रस्त वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनास्थळी नागरिकांनी गर्दी केली होती.





**महामार्गावरील ट्रक पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर**

बोडखा गावाजवळील या राजस्थानी धाब्याच्या परिसरात महामार्गाच्या कडेला तसेच रस्त्यालगत मोठ्या संख्येने ट्रक उभे केले जात असल्याने वाहतुकीला वारंवार अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार स्थानिकांकडून केली जात आहे. रात्रीच्या वेळी रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या ठिकाणी महामार्गावर होणारी अनधिकृत किंवा अडथळा निर्माण करणारी वाहन पार्किंग व्यवस्था तातडीने हटवून वाहतूक सुरळीत करण्यासाठी संबंधित विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# नेपाळ पूर परिस्थितीत अडकलेल्या जिल्ह्यातील पर्यटकांना आवाहन

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**अकोला :** नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या आपत्तीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील जे पर्यटक सध्या नेपाळमध्ये असल्यास किंवा पूरस्थितीमुळे अडकले आहेत किंवा ज्यांचा त्यांच्या कुटुंबीयांशी संपर्क होत नाही, त्यांनी अथवा त्यांच्या नातेवाईकांनी तत्काळ जिल्हा आपत्कालीन कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला तसेच पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# प्रभाग 12 मध्ये सीएसआर निधीतून साकारलेल्या ओपन जिमचे खासदार धोत्रे यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**मुर्तिजापूर :** शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रयत्नातून सीएसआर निधीतून साकारण्यात आलेल्या ओपन जिमचे रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना खुल्या वातावरणात नियमित व्यायामाची सुविधा उपलब्ध झाली असून, नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात आले.

ओपन जिमच्या लोकार्पणप्रसंगी शिक्षण सभापती सौ. सरिता राहुल पाटील यांनी खासदार अनुप धोत्रे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी शहराच्या विकासासह विविध विषयांवर



चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या आरोग्यासाठी सीएसआर निधीचा योग्य वापर करून प्रभागात उपयुक्त सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाला नगराध्यक्ष हर्षल साबळे, उपनगराध्यक्ष रोहित अवलवर, शिक्षण सभापती सौ. सरिता राहुल पाटील, सौ. सुप्रिया राम खंडारे, सचिन देशमुख, पंकज कांबे, निलेश वानखडे, नगरसेवक गजानन नाकट, रवि मडकर, मुकेश काळबांडे, राहुल पाटील, सचिन खरतडकर, भूषण कोकाटे, रितेश सबजाकर, आरिफ भाई, राजू हांडे, अमित नागवान, सतीश शेगावकर यांच्यासह सर्व नगरसेवक आणि परिसरातील असंख्य नागरिक उपस्थित होते.

# तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती मिळेल

**अकोला :** तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशु मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण असून, सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोजसोबत, अधिक प्रभावी असलेले इंजेक्शन फेरीक कार्बोक्सी माल्टोजही उपलब्ध करून देण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात मातृ आरोग्याला प्राधान्य देत सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे रक्तक्षयावरील उपचारांना गती देण्यात आली आहे. गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो.

# प्रगती दिनेश कल्पेकर ठरली "कौन बनेगा करोडपती" ची यशस्वी स्पर्धक

प्रतिनिधी २७ऑगस्ट

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अमरावती येथील विभागीय माहिती कार्यालयात लिपिक-नि-टंकलेखक पदावर कार्यरत कु. प्रगती दिनेश कल्पेकर हीने सोनी टिव्हीवरील "कौन बनेगा करोडपती" या बहुचर्चित, सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धात्मक कार्यक्रमात विविध काठिण्यपातळ्या पार करीत प्रवेशित होऊन बिगबी अमिताभ बच्चन यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देत तीन फे-या पूर्ण करून 5 लाखांचे मोठे बक्षिस पटकावले आहे. वाचन, मनन आणि स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाचा छंद जोपासलेल्या



कु. प्रगतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.प्रारंभी प्राथमिक प्रवेश फेरीत विविध कठीण चाचण्या व संगणकाद्वारे Randomly निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये कु. प्रगती हीने मारलेली धडक अत्यंत कौतुकास्पद व लक्षवेधी ठरली. त्यानंतर केबीसीच्या चमूकडून संपर्क साधून तिला स्पर्धेसाठी बोलावले गेले. मागील आठवड्यात ही स्पर्धा खेळली गेली. प्रथम 'फास्टेस्ट बझर फर्स्ट'या चाळणी पद्धतीमध्ये केवळ काही मिलीसेकंदांचा फरकही कोणाची निवड होणार हे ठरवू शकतो. त्यामुळे अंतिम निकाल हा केवळ ज्ञानावर नव्हे, तर वेळेचे अचूक भान, क्षणातील प्रतिक्रिया आणि काही प्रमाणात नशिबावरही अवलंबून असतो. यातही ती अव्वल ठरली व बिगबीच्या समोरील "हॉटसीट"ची ती मानकरी ठरली. कु. प्रगतीच्या "कौन बनेगा करोडपती" या स्पर्धेच्या चित्रीकरणाचे एपिसोड गुरुवार 27 ऑगस्ट आणि शुक्रवार 28 ऑगस्ट रोजी रात्री 9 वाजता सोनी टीव्हीवर दोन भागात प्रसारित होणार आहेत. अमरावतीकर आपण सर्वांनी एपिसोड नक्की पाहावेत असे आवाहन करण्यात येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135